



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६४ वे * अंक १७५ * नांदेड * मंगळवार, दि. १ जुलै २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# हिंदीचा जीआर रद्द झाल्यानंतर ठाकरे बंधूंचा ५ जुलै रोजी एकत्रित विजयी मेळावा



**मुंबई (प्रतिनिधी)–** गेल्या अनेक दिवसांपासूव मनसेचे प्रमुख राज ठाकरे आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या युतीची चर्चा चालू आहे. विशेष म्हणजे आमच्या दोघांत थेट जरी नसली तरी एकत्र येण्याबाबत चर्चा चालू आहे, असे ठाकरे यांनी सांगितले आहे. दरम्यान, हिंदीचा जीआर रद्द झाल्यानंतर दोन्ही ठाकरे बंधू ५ जुलै रोजी विजयी मेळाव्याला मुंबईत एकत्र येणार आहेत. विशेष म्हणजे या मेळाव्याचे आता ठिकाणही ठरले आहे. जिथं शिवसेनाप्रमुख तथा दिवंगत नेते बाळासाहेब ठाकरे यांचे पहिले भाषण झाले होते, त्याच ठिकाणी आता राज आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या मुंबईत होणाऱ्या विजयी मेळाव्याचे ठिकाण ठरलेले आहे. येत्या ५ जुलै रोजी हा विजयी मेळावा होणार आहे. मुंबईतील दादरमध्ये असलेल्या शिवाजी पार्कात हा ऐतिहासिक मेळावा होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे याच ठिकाणी शिवसेनेची स्थापना झाल्यानंतर १९ जून १९६६ रोजी बाळासाहेब ठाकरे यांनी पहिले भाषण केले होते. शिवसेनाप्रमुख म्हणून त्यांनी याच जागेवरून संपूर्ण शिवसैनिक तसेच महाराष्ट्राला संबोधित केले होते. त्यांच्या या भाषणानंतर शिवसेनेची वेल विस्तारतच राहिली. आता याच ठिकाणी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येऊन भाषण करणार आहेत.

राज्य सरकारने हिंदी सक्तीचा निर्णय रद्द करावा म्हणून ठाकरे गट आणि मनसेने संयुक्तपणे ५ जुलै रोजी मोर्चा काढण्याचं ठरवलं होतं. पण त्याआधीच सरकारने हिंदी सक्तीचे दोन्ही शासन निर्णय रद्द करून या मोर्चामधील हवा काढून घेण्याचा प्रयत्न केला. पण आमचं उद्दीष्ट साध्य झालं असलं तरी शिवसैनिक तसेच मराठी भाषाप्रेमी येत्या ५ जुलै रोजी जमणार आहेत. हा हिंदी सक्तीविरोधातील मोर्चा नसेल पण हा विजयी वेळावा असेल असे उद्धव ठाकरे यांनी जाहीर केले होते. तसेच त्यांनी यात मनसेनेही सहभागी व्हावे, असे आवाहन केले होते.

## दोघांनी एकत्र यावं, आम्हाला काहीही फरक पडत नाही –फडणवीस

ठाकरे बंधूंनी एकत्र येऊ नये म्हणून मी जीआर काढलेला नाही. दोन भावांना एकत्र येण्यासाठी मी रोखलंय का? त्यांनी एकत्र यावे, क्रिकेट खेळावं, टेनिस खेळावं, जेवण करावं, काहीही करावं आम्हाला काहीही फरक पडत नाही, असे प्रतिक्रिया राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

# आज व ४ जुलै रोजी नांदेडला येलो अलर्ट जारी



**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी ३० जून २०२५ रोजी दुपारी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी आज दि. १ जुलै व ४ जुलै या दोन दिवसांसाठी येलो अलर्ट जारी केलेला आहे. ३० जून २०२५ ह्या दिवशी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस व ०१ जुलै व ०४ जुलै २०२५ हे दोन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# केमिकल फॅक्टरीत अणुभट्टी युनिटमध्ये भीषण स्फोटात १० कामगारांचा मृत्यू

## २० जखमी; कामगार १०० मीटरवर उडून पडले



**संगारेड्डी (प्रतिनिधी)–** तेलंगणातील संगारेड्डी जिल्ह्यातील एका औषध कारखान्याच्या अणुभट्टी युनिटमध्ये झालेल्या स्फोटात १० कामगारांचा मृत्यू झाला. मात्र, अद्याप त्याची अधिकृत पुष्टी झालेली नाही. अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्याने सांगितले की, ढिगाऱ्यातून पाच कामगारांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत तर १३ कामगारांना वाचवण्यात आले आहे. याशिवाय २० हून अधिक कामगारांना गंभीर दुखापत झाली आहे. मृतांचा आकडा वाढू शकतो. तसेच, ढिगाऱ्यात अनेक लोक अडकल्याचे वृत्त आहे. सकाळी साडे नऊ वाजता पशामिलाराम येथील सिगाची इंडस्ट्रीजमध्ये ही दुर्घटना घडली. स्फोटाचे कारण अद्याप कळलेले नाही. मिळालेल्या माहितीनुसार, अणुभट्टीमध्ये अचानक जलद रासायनिक अभिक्रियेमुळे स्फोट होऊ शकतो.

प्रत्यक्षदर्शींच्या मते, स्फोट इतका जोरदार होता की तेथे काम करणारे कामगार सुमारे १०० मीटर अंतरावर पडले. स्फोटामुळे अणुभट्टी युनिट उद्ध्वस्त झाले आहे. काही कामगार ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती आहे. आग आटोक्यात आणण्यासाठी दोन अग्निशमन रोबोट आणि आपत्ती प्रतिसाद युनिट्स देखील तैनात करण्यात आल्या आहेत.

सिगाची इंडस्ट्रीज फार्मास्युटिकल पावडर बनवते. ते १९८९ पासून मायक्रोक्रिस्टलाइन सेल्युलोज बनवत आहे. ही पांढऱ्या रंगाची पावडर आहे. त्याला वास किंवा चव नाही. एमसीसीचा वापर औषध आणि सौंदर्यप्रसाधन उद्योगांमध्ये केला जातो. सिगाची इंडस्ट्रीजचे हैदराबादसह देशभरात पाच कारखाने आहेत. कंपनीची उत्पादने ६५ हून अधिक देशांमध्ये निर्यात केली जातात. कारखान्यात झालेल्या स्फोटानंतर, सिगाची इंडस्ट्रीजचे शेअर्स मुंबई शेअर बाजारात ९.८९ टक्क्यांनी घसरले. आतापर्यंत ते प्रति शेअर ४९.७२ रुपयांवर व्यवहार करत आहे.

# हुजूर साहिब नांदेड ते तिरुपती दरम्यान विशेष गाडीच्या १६ फेऱ्या

**नांदेड (प्रतिनिधी)–** अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी, दक्षिण मध्य रेल्वे नांदेड ते तिरुपती दरम्यान विशेष गाड्या चालवणार आहे:

गाडी क्रमांक ०७१८९/०७१९० ही विशेष गाडी मुदखेड, धर्माबाद, बासर, निजामाबाद, कामारेड्डी, मेडचल, चेरलापल्ली, नलगोंडा, मिर्यालागुडा, नाडीकुडे, पिदुगुरल्ला, नेमलीपुरी, रोमपिचेर्ला, विनुकोंडा, डोनाकोंडा, मरकापुरम रोड, कुंबम, गिद्दलूर, दिगुवामेट्टा, नंदयाल, जम्मालामादुगु, येरागुंतला, कडप्पा, नांदलूर, रझाम्पेटा, कोदुरू आणि रेनिगुंटा या स्टेशन दोन्ही दिशांना थांबेल. या विशेष गाड्यांमध्ये २ एसी, ३ एसी, स्लीपर आणि सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे असतील. या विशेष गाड्याची ८ फेऱ्या असतील.

गाडी क्रमांक ०७०१५/०७०१६ ही विशेष गाडी मुदखेड, बासर, निजामाबाद, कामारेड्डी, मेडचल, मलकाजगिरी, काचीगुडा, उमदानगर, शादनगर, जेडचेरला, महबूबनगर, वानपर्थी रोड, गडवाल, कर्नुल सिटी, ढोण, गुत्ती, ताडीपत्री, येरागुंतला, कडप्पा, ओंतीमिटा, राझमपेटा, रेनिगुंटा या रेल्वे स्थानकांवर दोन्ही दिशांना थांबेल. या विशेष गाड्यांमध्ये १ एसी, २ एसी, ३ एसी, स्लीपर आणि सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे असतील. या विशेष गाड्याची ८ फेऱ्या असतील.

# छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते वजिराबाद मुथा चौक वाहतुकीसाठी पंधरा दिवस बंद राहणार

**नांदेड (प्रतिनिधी) –** शहरातील रस्त्याच्या कामामुळे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते वजिराबाद मुथा चौक या मार्गावरील सर्व प्रकारच्या वाहतुकीस दि. १ ते १५ जुलैपर्यंत प्रतिबंध करण्यात आले आहे. या मार्गावरील वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग म्हणून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा-महावीर चौक ते मुथा चौक असा राहील.

मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ११५ मधील तरतुदीनुसार जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी संबंधित विभागाने पुढीलप्रमाणे उपाययोजना करुन दि. १ ते १५ जुलै कालावधीत नमुद केलेल्या पर्यायी मार्गाने सर्व प्रकारची वाहने वळविण्यास मान्यता दिली आहे. वजिराबाद मुथा चौक ते महावीर चौक हा रस्ता एकेरी मार्ग असून रस्त्याचे काम होईपर्यंत सदर मार्ग दुहेरी वाहतुकीसाठी वापरण्यासाठी सुद्धा परवानगी देण्यात आली आहे.

नांदेड पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने आवश्यक ती उपाययोजना करावी. नांदेड सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी रस्ता वाहतूक प्रतिबंध व पर्यायी रस्त्यासाठी आवश्यक असलेले बोर्ड, चिन्ह लावणे इत्यादी बाबतची कार्यवाही करावी, असेही अधिसूचनेत नमूद केले आहे.




# रेल्वे तिकीट तपासणी, विविध गाड्यांत छापे

## एकाच दिवसात १४ गाड्यांची तपासणी, १.३० लाख रुपये वसूल



**नांदेड (प्रतिनिधी)–** दि. २८ जून रोजी लिंबगाव हे बेस स्टेशन असल्याने मोठ्या प्रमाणात तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली. एकाच दिवसात १४ गाड्यांची तपासणी करून जवळपास १ लाख ३० हजार रूपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

विभागीय वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक डॉ. विजय कृष्णा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक एन. सुब्बा राव यांच्या देखरेखीखाली सकाळी ५ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत ही छापेमारी करण्यात आली, ज्याचा उद्देश प्रमुख विभागांमध्ये तिकीटविरहित प्रवास आणि अनधिकृत विक्रेत्यांना आळा घालणे आहे.

प्रवाशांमध्ये आणि कर्मचाऱ्यांमध्ये धाक निर्माण करण्यासाठी १७६६३ तांडूर एक्सप्रेस, १७६८८ मराठवाडा एक्सप्रेस, १७६१२ राज्य राणी एक्सप्रेस, १७६१३ पनवेल एक्सप्रेस, ५७६५४ आदिलाबाद-परळी पॅसेंजर, ७७६५१ परळी-आदिलाबाद पॅसेंजर, १७०५७ देवगिरी एक्सप्रेस इत्यादी गाड्या थांबवून खालील गाड्यांवर अचानक तपासणी करण्यात आली.

या धोरणात्मक तपासणीमुळे तिकीट नसलेल्या प्रवाशांमध्ये आणि अनधिकृत फेरीवाल्यांमध्ये, विशेषतः नांदेड-परभणी-पूर्णा-परळी-परभणी-अकोला विभागांमध्ये नैतिक भीती निर्माण झाली.

या तिकीट तपासणी मोहिमेत एन. सुब्बाराव यांच्यासमवेत मुख्य तिकीट निरीक्षक /जनरल, ३ कमर्शियल इन्स्पेक्टर, २ आरपीएफ कर्मचाऱ्यांसह एकूण २५ तिकीट तपासणी कर्मचारी मोहिमेत सहभागी झाले. तपासणीदरम्यान एकूण १४ गाड्या तपासण्यात आल्या.

तपासणीत ३३९ प्रवासी तिकीट नसलेले, अनियमित तिकिटवर प्रवास करताना आढळले, त्यांच्याकडून १ लाख ३० हजार ६४० रुपये वसूल केला. प्रवासी शिस्त सुनिश्चित करण्यात आणि महसूल वाढवण्यात ही मोहीम अत्यंत प्रभावी ठरली. नांदेड विभाग रेल्वे कामकाजाची अखंडता राखण्यासाठी आणि अधिकृत प्रवाशांना दर्जेदार सेवा प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहे.

# हिमाचलमध्ये पावसाचा हाहाकार; अनेक रस्ते पाण्याखाली


**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** हिमाचल प्रदेशात रविवारपासून मुसळधार पाऊस पडत आहे. भूस्खलनामुळे राज्यातील १२९ वरील वाहनांची वाहतूक थांबली आहे. पावसाळ्यापासून आतापर्यंत राज्यात ३९ जणांचा मृत्यू झाला आहे. गेल्या २४ तासांत ३ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. सोमवारी सकाळी हिमाचलच्या मंडी-कुल्लू राष्ट्रीय महामार्गावरील थलौतच्या भुभू जोत बोगद्याजवळ भूस्खलन झाले. यामुळे रस्ते वाहतुकीवर परिणाम झाला आहे. अनेक वाहने बोगद्यातही अडकली आहेत. सतर्कतेमुळे सोमवारी हिमाचलच्या ४ जिल्ह्यांमध्ये शाळा बंद आहेत. दुसरीकडे, बिहारमधील भोजपूर, बक्सर आणि नालंदा येथे वीज कोसळून ५ जणांचा मृत्यू झाला.




# अवजड वाहनांसह खासगी बस चालकांचा आजपासून बेमुदत संप

**मुंबई (प्रतिनिधी)–** आज (दि. १ जुलै) मध्यरात्रीपासून अवजड वाहने, खासगी बस, शाळेच्या बस चालक, मालकांचा बेमुदत संप सुरु होणार आहे. यात मुंबईच्या ३० हजार शाळेच्या बसेसचा समावेश आहे. जेएनपीटी येथील ३८ हजार कंटेनर वाहतूक चालकांचाही यामध्ये समावेश आहे. तसेच इतर देखील खासगी बस चालक, मालक यांचा समावेश आहे.

एल पी जी वाहक, अत्यावश्यक सेवा देणारे ट्रॅक, पाणी वाहक टँकर अशा सर्वच अवजड वाहतूक करणाऱ्या चालक आणि मालक यांचा आज मध्यरात्री पासून बेमुदत संप होणार आहे. ई-चलन कारवाई थांबवावी, क्लिनर अनिवार्य असल्याचा निर्णय मागे घ्यावा अशा मागण्यांसाठी सर्व अवजड वाहतूक करणाऱ्या संघटनांचा संप होणार आहे.





## * एकोनिसावे पुण्यतिथी निमंत्रण *



आपणास निमंत्रीत करण्यात येते की, आमच्या मातोश्री

**कै. गंगाबाई गंगाधरराव पिलगुंडे**

यांच्या **एकोनिसाव्या पुण्यतिथीचा** कार्यक्रम मंगळवार, दि. १ जुलै २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे. त्या निमित्त ह.भ.प.श्री. वसुदेव महाराज कोलंबीकर यांच्या किर्तनाचा कार्यक्रम सकाळी ११.०० वाजता आयोजित केला आहे. तरी या प्रसंगी आपण किर्तनाचा आनंद घेऊन भोजनास येवुन उपकृत करावे ही विनंती.

:: स्थळ ::
**कै. गंगाबाई पिलगुंडे यांच्या स्मारकाजवळ, लालवंडी,**
ता. नायगांव
जि. नांदेड
**:: भोजन वेळ ::**
दुपारी १२.३० ते आपल्या आगमनापर्यंत

------ विनीत ------

**श्री सुधाकरराव गंगाधरराव पिलगुंडे (लालवंडीकर)**
(मा. अध्यक्ष, नांदेड जिल्हा कुडमुडे/कुलेकडगी/यलम समाज संघ नांदेड)
(मुख्यप्रवर्तक, नियोजित नांदेड जिल्हा श्री अल्लमप्रभु सहकारी पतसंस्था मर्यादीत नांदेड जिल्हा नांदेड)
**व समस्त पिलगुंडे (लालवंडीकर) परिवार**
मो. ९४२०५४०७९५, ८३९०३७८४८४

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील


# पालकांचेही समुपदेशन आवश्यक

सांगली जिल्ह्यातील आटपाडी गावातील एका मुख्याध्यापकाच्या निर्दयी कृत्याने पुन्हा एकदा समाजासमोर एक अस्वस्थ करणारा आरसा धरला आहे. 'नीट' परीक्षेच्या सरावात अपेक्षित गुण मिळाले नाहीत, या कारणावरून बारावीतील आपल्या मुलीला जात्याच्या खुंट्याने मारहाण करून ठार करणाऱ्या बापाच्या या विकृत वागणुकीने महाराष्ट्र हादरून गेला आहे. एक नाजूक जीव हे क्रौर्य सहन करू शकला नाही आणि आपल्याच वडिलांच्या हातून मृत्यूला सामोरा गेला. ही घटना समाजाच्या प्रत्येक घटकाने अंतर्मुख होऊन पाहण्याची गरज आहे. आता तरी मुलांच्या स्वप्नांना त्यांच्या पंखांवर उडू द्या. त्यांना तुमच्या अपूर्ण आकांक्षांचे बोचके नकोय, फक्त तुमचा विश्वास हवा आहे. पालकत्व म्हणजे प्रेम, समजूत आणि आधार. पण जेव्हा हेच पालक स्वतःच्या अपूर्ण आकांक्षांची उधळण आपल्या मुलांवर करू लागतात, तेव्हा या अशा विकृत घटना जन्माला येतात. या घटनेतून अनेक प्रश्न निर्माण होतात. आपली मुले परीक्षेत यशस्वी होतात की नाही, यावरच आपले जीवनमूल्य मोजायचे काय? अति उच्च शिखरावर पोहोचविणारी एक ना अनेक क्षेत्र असताना मुलांनी डॉक्टर, इंजिनिअर, आयएएसच व्हावे, हा आग्रह कोणत्या ग्रंथात लिहिला आहे? त्यांच्या स्वप्नांची आणि क्षमतेची कदर न करता केवळ आपल्या अपूर्ण महत्त्वाकांक्षांची पूर्तता करण्यासाठी तेच आयुष्य का जगवले जाते? मानसशास्त्रीय सर्वेक्षण सांगते की, आजच्या समाजात सुमारे २७ टक्के लोक गंभीर नैराश्यातून जात आहेत आणि त्याचे रूपांतर अनेकदा मनोविकारात होते. पालकांच्या मनातही अशी नैराश्याची छाया असते, जी नकळत त्यांच्या वर्तनातून दिसून येते. मुलांनी 'नीट', 'जेईई', 'यूपीएससी' यांसारख्या परीक्षांमध्ये यश मिळवलेच पाहिजे, हा विचार टोकाचा आहे. जीवन अनेक संधी देत असते, फक्त त्याकडे पाहण्याची दृष्टी लागते. पालक अनेकदा आपल्या स्वप्नांचा भार मुलांवर टाकतात. आपण बनू शकलो नाही, ते मुलांनी व्हावं, असा अट्टाहास केला जातो. या मानसिकतेमुळे मुलं सतत दडपणाखाली जगतात. त्यांचं बालपण, तारुण्य, आणि काही वेळा संपूर्ण जीवन या मानसिक ओझ्याखाली उद्ध्वस्त होतं. शिक्षक असणाऱ्या बापानेच मुलीच्या क्षमतेवर विश्वास ठेवायचा सोडून तिला ठार मारण्याचा निर्णय घेतला, ही शिक्षणसंस्थाच नव्हे तर संपूर्ण समाजासाठी काळीज पिळवटून टाकणारी बाब आहे. अशा प्रकारची ही पहिलीच घटना नव्हे. यापूर्वी देखील अशा अनेक घटना घडलेल्या आहेत, या कठोर वास्तवाच्या पार्श्वभूमीवर, काही प्रेरणादायी उदाहरणे समाजासाठी दीपस्तंभ ठरतात. खुशवंतसिंग यांनी कायद्याची परीक्षा सलग १० वेळा नापास झाल्यावरही पत्रकार म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली. गांधीजींनी बॅरिस्टर म्हणून सुरुवात केली, पण अखेर त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःला वाहून घेतले. आजही डॉ. विकास दिव्यकीर्तीसारखे शिक्षक विद्यार्थ्यांना यशाच्या संकुचित व्याख्येपलीकडे विचार करायला शिकवत आहेत. नीट, जेईई, यूपीएससीपेक्षाही अनेक मोठी क्षेत्र आहेत हे विसरता कामा नये. आनंद देणारं, समाधानी जीवन जगण्यासाठी अनेक वाटा खुल्या आहेत, हे ते विद्यार्थ्यांना सातत्याने सांगतात. शिक्षण व्यवस्था आणि समाज दोघांनीही याचा गांभीर्याने विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेच्या गृहीत यशासाठी नव्हे, तर अपयश पचवण्याची मानसिक तयारी, आत्मविश्वास, आणि जीवनाविषयीची समज निर्माण करणारे शिक्षण आवश्यक आहे. यासाठी पालकांचे समुपदेशन आणि शिक्षकांचे प्रशिक्षण तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येक व्यक्ती काही क्षेत्रात पारंगत असतो तर काही क्षेत्रात नसतो, याचा अर्थ ते अपात्र आहेत असे नव्हे. तर बहुधा त्यांच्यातील मूळ गुणांना समजून घेण्यात अपयशी ठरलेली व्यवस्था, शिक्षणपद्धती आणि कुटुंबच जबाबदार असतात. यासाठी वैयक्तिक महत्त्वाकांक्षा नव्हे तर व्यक्तिगत समज, सहानुभूती आणि आत्मपरीक्षण महत्त्वाचं ठरतं.

# कृषिक्रांतीचे अग्रदूत : वसंतराव नाईक

शेतकरी हा भारतीय समाज व्यवस्थेचा कणा आहे. शेतकरी जगला तरच देश जगेल. शेतकरी व शेतीच्या विकासासाठी त्यांनी जिवाचे रान केले. राजकीय क्षेत्रात त्यांनी सर्वसामान्य माणसाला लोकशाही व्यवस्थेचा अविभाज्य घटक बनविले.व लोकशाहीच्या विकेंद्रीकरणावर भर दिला. शेतकरी सुखी तर देश सुखी हा मूलमंत्र उराशी बाळवून त्यांनी शेती उत्पादनात प्रचंड वाढ करण्या साठी समाज हिताचे अनेक निर्णय हाती घेतले.प्रत्येक तरुणाला काम मिळावे. म्हणून कृषिक्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करून दिल्या. पाणी अडवा, पाणी जिरवा, धवल क्रांती, हरितक्रांती यासारख्या कायमस्वरूपी योजना त्यांनी राबविल्या.

'जर दोन वर्षात राज्याला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केलं नाही तर शनिवार वाड्यात मला फाशी द्या. असे स्पष्टपणे बोलणारे हरितक्रांतीचे जनक कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा घेतलेला आढावा.



वसंतराव नाईक यांचा जन्म १ जुलै १९१३ रोजी ता.पुसद मधील गहुली या छोट्याशा खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव फुलसिंग व आईचे नाव होणुबाई होते. त्यांचे कुटुंब सधन होते. त्यामुळे त्यांनी त्या काळामध्ये कायद्याचे शिक्षण शिकले. विदर्भात त्यांनी काही ठिकाणी वकिली केली. १९५९ साली गोरगरिबांना शिक्षण मिळावे, प्रत्येक विद्यार्थी हा शिकलाच पाहिजे. शिक्षण हे सर्वांगीण सुधारणेचे प्रवेशद्वार आहे.कोणीही अज्ञानी, निरक्षर राहू नये हा हेतू मनात ठेवून जो शिकला,तोच टिकला या सुभाषिता प्रमाणे त्यांनी वडिलांच्या नावावर पुसद येथे फुलसिंग महाविद्यालयाची स्थापना करून विद्यार्थ्यांना घडवण्याचे पवित्र कार्य हाती घेतले. त्यांच्या कार्याचा ठसा सर्वत्र उमटत होता. म्हणून ते पुसद येथेच पुढील काळात नगराध्यक्ष झाले.

पुढे रयतेने त्यांना विधानसभेवर भरघोस मतांनी निवडून दिले. हा त्यांचा राजकीय प्रवास प्रेरणादायी होता.नंतर ते राज्याच्या राजकारणातं सक्रिय झाले. त्याच वेळेस १९५२ ते १९५७ मध्ये मध्यप्रदेश विधान सभेत महसूल मंत्री म्हणून त्यांनी अतिशय उत्कृष्टपणे कार्य केले. तद्नंतर १९५७ ते १९६० मध्ये तत्कालीन द्विभाषिक मुंबई राज्याचे कृषिमंत्री मंत्री म्हणून त्यांची निवड झाली. आवडीचे खाते मिळाले म्हणून त्यांनी अतिशय चांगलं कार्य केले.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली, आणि महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य म्हणून निवडून आले. कै. मारोतराव कन्नमवार मृत्यू पावल्या नंतर त्यांची महाराष्ट्राचे चौथे मुख्यमंत्री म्हणून निवड करण्यात आली. त्यांच्या कारकिर्दी मध्ये त्यांनी शेतकऱ्याला अतिशय सन्मानाची वागणूक दिली. १९७२ चा दुष्काळ आठवला की पोटात कळा येऊ लागतात. त्या काळात त्यांनी दुष्काळग्रस्त महाराष्ट्र राज्याचा कारभार अतिशय सचोटीने पाहिला. शेतकऱ्यांना भरभरून मदत केली. शेतकरी सुखी असेल तर आपण सुखी राहु, असे त्यांनी प्रतिपादन केले. एका बाजूला दुष्काळ असला तरी त्यांनी त्या काळात शेतकऱ्यांना अन्नधान्य कमी पडू दिले नाही. ही विशेष बाब सांगावी वाटते. म्हणूनच त्यांना हरित क्रांतीचे जनक म्हणून आज सर्वत्र ओळखले जाते. शिक्षकाचे स्थान समाज व्यवस्थेत महत्त्वाचे आहे. शाळा व शिक्षक यांना सर्वांनी श्रद्धास्थाने मानले पाहिजेत.

असे त्यांचे मत होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या मनावर पडलेला होता. त्यामुळे ते ग्राम स्वच्छता, शेतीचा विकास, अज्ञान दूर करणे, सर्वांनी एकत्रित येणे असे अनमोल विचार त्यांनी समाजासमोर ठेवले होते.

महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणून बांधा-बांधावर जाऊन त्यांनी शेतकऱ्यांना मदत केली. म्हणून त्यांच्या कार्याचा सुगंध वर्षानुवर्ष दरवळत आहे. त्यांची कीर्ती वाऱ्यासंग जात आहे. सत्य लोप पावत नसते. ते आणखीही जिवंत आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी चीन, युगोस्लाव्हाकिया अमेरिका अशा अनेक देशाचे यशस्वी दौरे केले. पहिले शेतकरी मुख्यमंत्री म्हणून त्यांची गणना केली जाते.

समाजसेवेसाठी कार्य करणाऱ्या व्यक्तीला कोणीही विसरू शकत नाही.खरोखरच आपले आयुष्य हे समाजाच्या सेवेसाठीच आहे. म्हणून त्यांनी अहोरात्र परिश्रम केले. त्यामुळेच ते पुढे वाशिम मतदार संघातून १२ मार्च १९७७ मध्ये लोकसभेवर निवडून गेले. महाराष्ट्र सरकारने यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास व मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी येथे त्यांचे नाव देऊन त्यांच्या कार्याचा यथोचित सन्मान केलेला आहे. तसेच त्यांच्या कार्याचे नेहमी स्मरण व्हावे म्हणून १ जुलै रोजी त्यांचा जन्मदिन कृषी दिन म्हणून यापुढे साजरा करण्यात येईल असे सांगितले.

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळा मार्फत कर्ज योजना सुरू करण्यात आली. 'महानायक वसंत तू' हा त्यांच्या कार्यावर काढलेला चित्रपट अतिशय गाजला. ५ डिसेंबर १९६३ ते २० फेब्रुवारी १९७५ पर्यंत तीन वेळा महाराष्ट्राचे कार्यक्षम मुख्यमंत्री म्हणून नावा रूपाला आले. ते एक महान विचारवंत होते. कृषी क्षेत्रात केलेल्या आमुलाग्र सुधारणेमुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत असे. शेतकरी राजांना त्यांनी कधी ही दूर केले नाही. आजची परिस्थिती आपण पाहत आहोत.शेतीमालाला कवडीमोल भाव दिले जात आहेत. दररोज शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. तरी शेतकऱ्याकडे शासन म्हणावे तेवढे लक्ष देत नाहीत. अशी अवस्था निर्माण झाली आहे. बी-बियाण्याच्या किमतीत भरमसाठ वाढ झाली आहे. शेतीत होणारा खर्च आणि येणारा नफा यांचा ताळेबंद कुठेही जुळताना दिसत नाही. म्हणून तर शेतकरी कर्जबाजारी होत आहेत. कै.वसंतरावजी नाईक यांच्या काळात कोणत्याही ठिकाणी शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या नाहीत. ही विशेष बाब आहे. त्या काळात त्यांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले. त्यामुळेच ते हरित क्रांतीचे जनक झाले. असे आपणाला आज ठामपणाने सांगता येईल.

लालबहादूर शास्त्री यांनी जय जवान, जय किसान ही घोषणा दिली होती. जोपर्यंत किसान या देशांमध्ये जिवंत आहे. तोपर्यंत आपल्याला काही कमी पडणार नाही, अशी ती घोषणा होती. आज शेतकरी आंदोलन करीत आहेत, तरी त्या आंदोलना- कडे दुर्लक्ष केले जात आहे. ही बाब मनाला खंत वाटणारी आहे. आज धनधान्याला, भाजीपाल्याला, फुले-फळांना शेतकऱ्यांच्या योग्य भाव मिळत नाही. ही जबाबदारी कोणाची आहे. का होत आहे असे. जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण झाले असले तरी महाराष्ट्रातला शेतकरी गरीबच राहिलेला आहे. वसंतराव नाईकांचा पुन्हा काळ येईल काय? असे आपल्याला वाटत आहे. शेतकऱ्यावर येणारे सर्व आस्मानी व सुलतानी संकट त्यांनी बाजूला सारले होते. त्यामुळेच त्यांना कृषी संत असेही महाराष्ट्रातील जनता आदराने म्हणत होती. दुष्काळामध्ये केलेल्या कार्याचा आढावा घेऊन तसेच अकरा वर्षे महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री म्हणून वसंतरावांनी जे कार्य केले त्या कार्याचा यथोचित गौरव करण्यासाठी त्यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी पुरस्कार द्यावा असे जनतेचे मत आहे. हरित क्रांतीचे प्रणेते, कृषी संत, पंचायत राज व्यवस्थेचे जनक, महाराष्ट्राचे थोर नेते कै. वसंतराव फुलसिंग नाईक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन.

**-प्रा. विठ्ठल बरसमवाड**
संस्थापक अध्यक्ष: विठू माऊली प्रतिष्ठान
खैरकावाडी ता. मुखेड

# पावसाच्या सरींनी भिजलेल्या हिंदी चित्रपटांच्या गाण्यांचा मनमोहक प्रवास

पावसाच्या सरी आणि रिमझिम फुहारांनी प्रत्येकाचे मन मोहरून जाते. काळ्याकुट्ट ढगांमधून झरझरत बरसणाऱ्या पावसाच्या थेंबांमध्ये भरलेल्या भावना आणि आठवणी आजही अनेक हिंदी चित्रपट आणि सुरेल गाण्यांतून अविस्मरणीय ठरलेल्या आहेत. चला तर मग, अशाच काही पावसाळी सिनेमांवर आणि सदाबहार गाण्यांवर एक नजर टाकूया.



**पावसाने चिंब केले चित्रपटांचे विश्व**

हिंदी सिनेमाने आपल्या सुरुवातीच्या काळापासूनच पावसाच्या सौंदर्याला विविध प्रकारे मोठ्या पडद्यावर उतरवले आहे. काही चित्रपटांचे कथानकच पावसाभोवती फिरते, तर काहींमध्ये पावसाशी संबंधित गाणी प्रेक्षकांना भारावून टाकतात. कधी आशेच्या स्वरूपात पावसाच्या थेंबांतून भावना दाखवण्यात आल्या, तर विरहाच्या वेदना सांगण्यासाठीही श्रावणभाद्रपदाच्या आठवणी जागवल्या गेल्या. विशेषतः प्रेमीयुगलांसाठी रोमँटिक क्षण घडवण्यासाठी पावसाळ्याचा ऋतू बॉलिवूडसाठी सर्वात उपयुक्त मानला जातो.

**पडद्यावर आणि पडद्याबाहेरही पावसाचे जादू**

कधी कृत्रिम पावसात शिफॉन साडीत नायिकेचा नृत्य अभिनय गाजला, तर कधी खऱ्या पावसात मुंबईच्या रस्त्यांवर रिमझिम गिरे सावन (अमिताभ-मौसमी चटर्जी : मंज़िल १९७९) सारखी गाणी चित्रित झाली. आजच्या सोशल मीडियाच्या युगातही अनेक तरुण पिढी ही गाणी रिक्रिएट करून रील्स तयार करताना दिसते. हेच तर आहे बॉलिवूडच्या पावसाचं जादू नायक-नायिकांमधील रुसवेफुगवे, नकार आणि मग कबुली... पावसाच्या टिपटिप सरींतून इतक्या दिलखेचक पद्धतीने चित्रित केली जातात की अनेकांना हे क्षण प्रत्यक्षात अनुभवावेसे वाटटाट.

पुरवा के झोकवा से आयो रे संदेसवा...किंवा घनन घनन घिर आए बदरा...ही गाणी केवळ आनंदच नव्हे, तर आशेचा-उत्साहाचा सुद्धा वर्षाव करतात. तुम्हें गीतों में ढालूंगा, सावन को आ दो..., मौसम है आशिकाना, ऐ दिल कहीं से उनको ऐसे में ढूंढ लाना... अशा पावसात भिजलेल्या अनेक गीतांनी प्रेमवीर आणि सिनेरसिक यांना भुरळ घातली आहे. पावसाळा केवळ मिलनाची गाणीच गात नाही, तर विरहाच्या सुरांनाही उजाळा देतो. आठवतोय तो मोहम्मद रफींचा हळवा स्वर अजहू न आए बालमा, सावन बीता जाए...

**पावसावर आधारित चित्रपटांची मालिका**

हिंदी सिनेमात काही चित्रपट तर संपूर्णपणे पावसाभोवतीच फिरतात. काहींना तर थेट सावन किंवा बरसात हीच नावं दिली गेली आहेत. १९४५ मध्ये मोतीलाल आणि शांता आप्टे यांच्या सावनपासून सुरुवात झाली. १९४९ मध्ये आलेल्या राज कपूर यांच्या बरसातने हे सिद्ध केले की, पावसावर आधारित सिनेमे म्हणजे यशाचं हमखास सूत्र! नंतर बरसात नावाचे आणखी दोन चित्रपट आले, ज्यात बॉबी देअोल मुख्य भूमिकेत होते. १९६० मध्ये भारत भूषण आणि मधुबाला यांचा बरसात की रात, १९८१ मध्ये अमिताभ बच्चन आणि राखी यांचा बरसात की एक रात, आणि बरखा बहार, मानसून वेडिंग, तुम मिले, लगान, आया सावन झूम के, प्यासा सावन, सावन की घटा, सोलहवां सावन, सावन के गीत, सावन का महीना, सावन को आने दो, सावन-भादो यासारख्या अनेक सिनेमांनी पावसाचा आनंद टिपला आहे.

**अविस्मरणीय पावसाळी गाणी**

प्यार हुआ इकरार हुआ...राज कपूर आणि नरगिस यांच्या छत्रीखालील हळुवार चालत गेलेल्या या गाण्याने त्या काळातील प्रेमभावनांची शिखरं गाठली होती. आजही हे गाणं ऐकलं की मनाला भिजवून टाकतं. रोटी कपड़ा और मकान चित्रपटात जीनत अमानने गायलेले हाय हाय ये मजबूरी... या गाण्याने पावसाच्या वेळी नाते, जबाबदाऱ्या आणि अधुरी प्रेमकहाणी या सर्व गोष्टी प्रभावीपणे मांडल्या. जिंदगी भर नहीं भूलेगी वो बरसात की रात... हे मधुबाला-भारत भूषण यांच्यावर चित्रित गाणं अजूनही लोकांच्या मनात ताजं आहे. 'चांदनी' चित्रपटातील लगी आज सावन की फिर वो झड़ी है...हे रोमँटिक गाणं आजही काळजाला साद घालते.

**'हिट फॉर्म्युला' झालेली पावसाची फुंकर**

पावसाळी गाणी प्रेक्षकांना खूप भावतात हे लक्षात आल्याने, काही सिनेमांमध्ये मुद्दामच पावसावर आधारित गाणी घातली गेली. नमक हलाल चित्रपटात अमिताभ बच्चन आणि स्मिता पाटिल यांच्यावर चित्रित आज रपट जाएं तो... हे गाणं सुपरहिट ठरलं. गुरु मध्ये ऐश्वर्या रायने बरसो रे मेघा... वर केलेला नृत्य तर मनात घर करून बसतो. दिल तो पागल है मधील कोई लड़की है...,मोहरा मधील टिप टिप बरसा पानी, फना मधील ये साजिश है बूंदों की...,१९४२: ए लव्ह स्टोरी मधील रिम झिम रिम झिम... ही सर्व गाणी सुद्धा पावसाच्या श्रावणधारा प्रमाणे लोकांच्या मनात ठसून राहिली आहेत.

एकूणच, पावसाच्या सरींनी हिंदी चित्रपट आणि त्यांची गाणी चिंब चिंब करून टाकली आहेत. या गाण्यांनी आणि सिनेमांनी प्रेक्षकांच्या मनात प्रेम, विरह, आशा, आनंद आणि आठवणी यांचा वर्षाव केला आहे तोही अगदी टिपटिप सरींप्रमाणे!

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत जि.सांगली


# शिक्षण सारथी : डी. पी. सावंत

नको धर्मकृत्य पैसा खर्चूनिया,
घेण्यासाठी विद्या तोच खर्चा!
स्वतःचा उद्धार करा प्रयत्नाने,
शक्तीने, युक्तीने सुखी व्हावे!!

थोर समाजसुधारक, कर्मयोगी गाडगे महाराज यांनी वरील वचनातून विद्येचे महत्त्व अधोरेखित केले आहे. विद्या ही सर्वदूर पोहोचावी यासाठी फुले दांपत्यासह महाराष्ट्रातील अनेक शिक्षण महर्षी व समाजसुधारकांनी आपलं आयुष्य वेचले. उपेक्षितांच्या झोपडीतील अंधार दूर करण्यासाठी ज्ञानरूपी दिवा खूप महत्त्वाचा आहे. हा विचार केंद्रस्थानी ठेवून मराठवाड्यातील ऐतिहासिक अशा नांदेड नगरीत श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे बिजारोपण झाले. मराठवाड्याचे भाग्यविधाते, देशाचे माजी गृहमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण यांनी तत्कालीन आपल्या जाणत्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचा विस्तार घडवून आणला.

आज राज्याचे माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांच्या उत्तुंग नेतृत्वाने ही संस्था भरभराटीला आली आहे. संस्थेच्या उपाध्यक्षा, माजी आमदार सौ. अमिताभाभी चव्हाण यांचे संस्थेच्या उन्नतीकडे विशेष असे लक्ष असते. बदलत्या काळाप्रमाणे आवश्यक तो सकारात्मक बदल घडवून, संस्थेला अद्ययावत ठेवण्यासाठी अपार कष्ट घेणारे संस्थेचे कार्यकुशल सचिव, माजी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री डी. पी. सावंत हे शिक्षणाप्रती समर्पित भाव ठेवून सदैव काम करत असतात.

दोन बोटांनी लिहिण्या बरोबर, दोन हातानी काम करण्याचे सामर्थ्य निर्माण करणे म्हणजे शिक्षण अशी शिक्षणाची व्याख्या करणारे कर्मवीर भाऊराव पाटील हे शिक्षणाला रोजगाराभिमुख करण्यासाठी आयुष्यभर झटत राहिले. हाच कर्मवीर अण्णाचा विचार डोळ्यासमोर ठेवून शिक्षणतज्ज्ञ डी. पी. सावंत यांनी आपल्या संस्थेच्या माध्यमातून रोजगाराभिमुख शिक्षण देणाऱ्या अनेक शाखा निर्माण केल्या. यामधून हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन स्वावलंबी बनत आहेत.



दुरितांचे तीमिर जावो या ब्रिदाने सुरू.झालेल्या श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीला अधिक उंचीवर नेण्यासाठी डी. पी. सावंत हे सातत्याने प्रयत्नरत असतात. शाळा-महाविद्यालयातील अध्ययन- अध्यापन प्रक्रिया अधिक गतिमान व विद्यार्थी केंद्रित व्हावी यासाठी अध्यापक वर्ग हा बुद्धिमान, आपल्या कार्याप्रती अपार निष्ठा ठेवून प्रामाणिक काम करणारा असला पाहिजे, यावर डी. पी. सावंत यांचा नेहमीच कटाक्ष राहिला आहे. अध्यापनाबरोबर संशोधन करावे यासाठी संस्थेचे सचिव या नात्याने डी. पी. सावंत नेहमीच प्रोत्साहन देत असतात. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन काम करण्याची त्यांची भूमिका निश्चितच अभिनंदनीय आहे.

शिक्षण क्षेत्रात काम करत असताना हा मानवतावादी दृष्टिकोन जोपासलाच पाहिजे असे ते पोटतिडकीने सांगतात. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे एक वचन या निमित्ताने आठवतं...

मानवता है पथ मेरा,
गिरते को उठाना धर्म मेरा, एक जात बनाना वर्ग मेरा, दुहियों को मिटाना स्वर्ग मेरा,
सबकी भलाई कर्म मेरा...या उच्च प्रतीच्या भावनेने समाजकारण, राजकारण शिक्षण क्षेत्रात काम झाले तर नक्कीच सामाजिक एकोपा वृद्धीगत व्हायला मोठी मदत होत असते. हा राष्ट्रसंतांचा विचार डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करणारे डी. पी. सावंत म्हणूनच सर्वच समाजात लोकप्रिय आहेत.

सेवा, समर्पण, निष्ठा, त्याग व प्रामाणिकपणा यांचा समुच्चय म्हणजे डी. पी. सावंत. दोन टर्म नांदेड उत्तर विधानसभेचे आमदार म्हणून त्यांनी केलेली जनसेवा मतदारसंघातील लोकांच्या कायम लक्षात राहण्यासारखी आहे. नांदेड शहराला पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये यासाठी त्यांनी मोठ्या प्रयत्नातून आसना नदीवर पर्यायी पाणी पुरवठा योजना उभी केली. मतदार संघातील वाडी बुद्रुक येथे पहिली निम शहरी पाणीपुरवठा योजना कार्यान्वित केली.

१७ करोड रुपयांची ही पाणीपुरवठा योजना मराठवाड्यातील एका ग्रामपंचायतीला मिळण्याचे,हे पहिलेच उदाहरण होते.त्यासाठी डी. पी. सावंत यांनी प्रचंड मेहनत घेतली. ज्यामुळे आज वाडीसह ३० नगराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा मिटला. मतदारसंघात रस्त्याचे जाळे उभे केले.

शेतकऱ्यांना सिंचनाचा योग्य लाभ झाला पाहिजे यासाठी कॅनॉलची दुरुस्ती करून घेतली. जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून त्यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेली तळमळ साऱ्या जिल्ह्याने पाहिली आहे. डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला ११० करोड रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. आरक्षणाचे जनक, लोकराजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचा पावडेवाडी नाका परिसरात भव्य पूर्णाकृती पुतळा उभा करण्यासाठी डी. पी. सावंत यांनी प्रचंड मेहनत घेतली.

डी. पी. सावंत यांच्यासारखे अभ्यासू, प्रामाणिक, स्वच्छ प्रतिमा असणारे व्यक्तिमत्व पुन्हा जनतेलाही हवे आहे. येणाऱ्या काळात पुन्हा ते राजकारणात उभारी घेतील यात तीळमात्र शंका नाही. अनेकांच्या यशस्वी जीवनात डी. पी. सावंत यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे. कित्येकांच्या झोपडीतील दैन्य, दारिद्र्य दूर करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणारे डी.पी. सावंत हे लोकांच्या प्रेम, आशीर्वादाने मागच्या वर्षी झालेल्या एका अपघातातून सहीसलामत बाहेर आले. किरकोळ वाटणारा अपघात काहीसा गंभीर टप्प्यावर पोहोचला होता. पण उभ्या आयुष्यात कधीच कोणाचे वाईट न चिंतनाऱ्या व्यक्तीच्या जीवनात तरी वाईट कसे घडेल?

दुर्दम्य इच्छाशक्ती, डॉक्टरांचे अभिनव कौशल्य व जनतेच्या पुण्याईने डी. पी. सावंत हे तंदुरुस्त होवून आज नव्या दमाने समाजकारण, राजकारण, शिक्षण क्षेत्रात सक्रिय झाले आहेत. अनेक संकटावरती मात करून डी. पी. सावंत पुन्हा जनतेत आले आहेत. महाराष्ट्राचे लोकनेते, राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोकरावजी चव्हाण साहेब आणि माजी मंत्री डी पी सावंत साहेब यांच्या अभेद,अतूट, निर्मळ, निकोप मैत्रीचे नवे पर्व पुन्हा एकदा नांदेडकरांना अनुभवास मिळणार आहे.

आता सारे काही उत्तमच होईल....निर्मळ मनाच्या सोज्वळ व्यक्तिमत्त्वाचे अभीष्टचिंतन करताना विधात्याकडे एकच विनम्र प्रार्थना.

आपणांस निरोगी, सदृढ, दीर्घायू, आरोग्य लाभो हीच मनोकामना!!

**-प्रा. संतोष देवराये,**
नांदेड.
मो.९८६०८२०६५७

## थोडक्यात...

### 'जमाखर्च आयुष्याचा'वर आज परिसंवाद

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील लेखक बसवंत घेवारे लिखित 'जमाखर्च आयुष्याचा' या आत्मकथनावर दि. १ जुलै रोजी सायंकाळी शहरातील हॉटेल विसावा पॅलेस येथे परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. सेवानिवृत्त शिक्षणसंचालक गोविंद नांदेडे हे अध्यक्षस्थानी राहतील. पत्रकार शंतनु डोईफोडे, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य देवीदास फुलारी, स्वा. रा. ती. म. विद्यापीठाच्या मराठी भाषा वाङमय संकुलाचे संचालक प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर, लेखक बसवंत घेवारे उपस्थित राहणार आहेत. प्रकाशक दत्ता डांगे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. प्रा. धाराशीव शिराळे हे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणार आहेत.

### समाज कल्याण विभागात सामाजिक न्याय दिन साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)**– आरक्षणाचे जनक, रयतेचे राजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती येथील समाज कल्याण विभागात सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी समाज कल्याण विभागाचे उपायुक्त डॉ. शिवानंद मिनगीरे, रवी जाधव, क्रीडापटू तथा सामाजिक कार्यकर्ते लवकुश जाधव, संजय जाधव, मोहन तुरटवाड आदींची उपस्थिती होती. गुरुवारी दि. २६ जून रोजी येथील समाज कल्याण विभागात आरक्षणाचे पुरस्कर्ते, रयतेचे राजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी क्रीडापटू तथा सामाजिक कार्यकर्ते लवकुश जाधव यांच्यासह उपस्थितांनी मान्यवरांकडून छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

# जिल्ह्यातील ३० पेक्षा जास्त व १० खाटांच्या रुग्णालयाचा आयुष्यमान भारत आणि म. फुले जन आरोग्य योजनेत समावेश

**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्ह्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना मोफत वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यातील ३० पेक्षा जास्त खाटा असलेल्या रुग्णालयांचा तसेच खालील विशिष्ट एकल विशेषता असलेल्या १० खाटांच्या रुग्णालयांचा एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना यांच्या पॅनलवर समावेश करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मोठ्या प्रमाणात लाभ मिळेल आणि जिल्ह्यातील आरोग्य सुविधा अधिक सक्षम होतील.

**पात्र एकल विशेषता रुग्णालये (१० खाटांचे):** ईएनटी (नाक, कान, घसा), नेत्ररोग शास्त्र (नेत्रविकार), ऑर्थोपेडिक आणि पॉलीट्रॉमा (अस्थिव्यंग आणि पॉलिट्रॉमा), बर्न (भाजणे), बालरोग शस्त्रक्रिया, कर्करोग उपचार युनिट्स, नवजात आणि बालरोग वैद्यकीय व्यवस्थापन युनिट्स, हिमोडायलिसिस – मूत्रपिंड शास्त्र युनिट्स.

**आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (इ झच–गध) :** केंद्र सरकारची ही योजना देशभरातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबांना दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार प्रदान करते. यामध्ये १ हजार ३५६ प्रकारच्या गंभीर आजार, शस्त्रक्रिया आणि रुग्णालयात दाखल होण्याच्या खर्चाचा समावेश आहे.

**महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य :** महाराष्ट्र सरकारची ही योजना राज्यातील पात्र लाभार्थ्यांना ५ लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार देते. यामध्ये १ हजार ३५६ प्रकारच्या शस्त्रक्रिया आणि विशेष उपचारांचा समावेश आहे.

३० पेक्षा जास्त खाटा असलेली रुग्णालये आणि वर नमूद केलेल्या विशेषता असलेली १० खाटांची एकल विशेषता रुग्णालये जी राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण (एनएचए) आणि महाराष्ट्र राज्य आरोग्य हमी सोसायटी निकषांची पूर्तता करतील. ती आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांच्या पॅनलवर समावेशासाठी पात्र ठरतील. यामध्ये आधुनिक वैद्यकीय उपकरणे, प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी आणि उच्च दर्जाची रुग्णसेवा यांचा समावेश आहे.

**लाभ :** पॅनलवरील रुग्णालयांमध्ये या दोन्ही योजनांतर्गत लाभार्थ्यांना मोफत उपचार मिळतील. यामुळे गंभीर आजारांवरील उपचार परवडणारे होतील आणि रुग्णांचे आर्थिक भार कमी होईल.

**अर्ज प्रक्रिया:** रुग्णालयांनी पॅनलवर समावेशासाठी https://www.jeevandayee.gov.in (चगझगध) या संकेतस्थळांवर ऑनलाइन अर्ज करावा. अधिक माहितीसाठी नांदेड जिल्हा रुग्णालय येथे जिल्हा समन्वयक किंवा जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याशी संपर्क साधावा.

**सहाय्यकारी माहिती:** रुग्णालयांना अर्ज प्रक्रियेबाबत मार्गदर्शन मिळावे यासाठी ग्लोबल हेल्थ गुरु ऋथ्रेलरश्र क्शरश्रींह ऋींीं या युट्युब चॅनेलवर Hospital Empanelment pplication Form भरण्याचे प्रशिक्षण व्हिडिओ उपलब्ध आहे. रुग्णालय प्रतिनिधींनी र्धीेींलश वर ऋथ्रेलरश्र क्शरश्रींह ऋींीं हे चॅनेल भेट देऊन व्हिडिओ पाहावा.

**जिल्ह्यातील प्रमुख रुग्णालये:** नांदेड जिल्ह्यातील अनेक रुग्णालये ज्यात प्रामुख्याने ३० खाटांची रुग्णालये व नमूद केलेल्या विशेषता असलेली १० खाटांची रुग्णालये देखील या योजनेत सहभागी होण्यासाठी पात्र ठरू शकतात.

अधिक माहितीसाठी किंवा पॅनलवर समावेशासाठी, कृपया डॉ. दिपेशकुमार शर्मा, जिल्हा रुग्णालय, दूरध्वनी: ८२७५०९५८१८ येथे संपर्क साधावा किंवा https://www.jeevandayee.gov.in वर भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## तक्रार निवारण दिनानिमित्त नांदेड पोलीस दलातर्फे वरिष्ठ ४१६ व स्थानिक ४० असे ४५६ अर्ज निकाली

**नांदेड (प्रतिनिधी)**– पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकाऱ्यांनी दि. २८ रोजी नागरिकांच्या तक्रार निवारणाची मोहीम राबविली. यामध्ये जिल्ह्यात एकुण स्थानिक ४० व वरिष्ठ ४१६ असे एकुण ४५६ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली व संकल्पनेतून दर शनिवारी जिल्ह्यातील सर्वच पोलीस ठाण्यात नागरिकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी विशेष मोहीम राबविली जाते. त्यानुसार शनिवारी दि. २८ जून रोजी जिल्ह्यातील सर्वच पोलीस ठाण्यांमध्ये नागरिकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी मोहीम राबविण्यात आली. स्थानिक ४० व वरिष्ठ ४१६ असे एकुण ४५६ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. कामगिरीबाबत पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी कौतुक केले आहे. तसेच यापुढे दर शनिवारी नांदेड पोलीसांकडून तक्रार निवारणाची मोहिम राबविण्यात येणार असून नागरीकांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक यांनी केले आहे.

## 'आयआयपीए'शाखेचा निवडणूक कार्यक्रम जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)**– इंडियन इन्स्टिटयुट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन स्थानिक शाखा नांदेड या संस्थेचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक (प्रशासन) योगेशकुमार बाकरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या संस्थेच्या निवडणूक कार्यक्रमानुसार एकूण ६ संचालक आहेत. जिल्हाधिकारी हे चेअरमन पदसिद्ध अध्यक्ष आहेत. त्यामुळे व्हाईस चेअरमन १, सेक्रेटरी १, ट्रेझर १, आणि एक्झीकेटयुव्ह मेंबर २ असे एकूण ५ जागांची निवड करावयाची आहे. त्यानुसार निवडणूक कार्यक्रम असा : १ जुलै ते १५ जुलै दरम्यान प्रारुप मतदार यादीवर आक्षेप नोंदविणे, त्यानंतर १६ जुलै ते १७ जुलै दरम्यान आक्षेपाची छाननी, १८ जुलै रोजी सभासदाची अंतिम मतदार यादीस प्रसिद्धी, २५ जुलै रोजी नामनिर्देशन पत्राचे वाटप व स्विकृती, दुपारी १२.१५ वाजता प्रसिद्ध करण्यात येणार आहे. नामनिर्देशन पत्राची छाननी दु. १२.१५ ते १३ या कालावधीमध्ये करण्यात येणार असून वैध नामनिर्देशन पत्राची यादी १३.१५ वा. प्रसिध्द करण्यात येणार आहे. तसेच नामनिर्देशनपत्र १३.३० पर्यत माघारी घेता येणार आहेत. उमेदवारांची अंतिम यादी दु.१४ वा. प्रसिध्द करण्यात येणार आहे. आवश्यकता असल्यास दु. १४.३० ते १५.३० या वेळेत मतदान घेण्यात येणार आहे. झालेल्या मतदानाची मतमोजणी करण्यात येणार आहे. संस्थेच्या संचालक मंडळ निवडणुकीचा कार्यक्रम जिल्हाधिकारी नांदेड मिटींग हॉल येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येणार आहे. संलग्न जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड येथील कार्यालयात पाहावयास मिळतील, असे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## वसंतराव नाईक जयंतीनिमित्त आज विविध कार्यक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)**– हरित क्रांतीचे जनक, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त दि. १ जुलै रोजी नांदेड शहरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती वसंतराव नाईक स्मारक समितीचे सचिव प्रकाश राठोड यांनी दिली आहे.

डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जिल्हा शल्य चिकित्सालय नांदेड, आरोग्य विभाग जि. प. नांदेड, महानगरपालिका नांदेड व आयकॉन हॉस्पीटल यांच्या संयुक्त विद्यमाने महाआरोग्य शिबीराचे सकाळी १० वाजता वसंतराव नाईक पुतळ्याशेजारी आयकॉन हॉस्पीटल, नांदेड येथे आयोजन करण्यात आले आहे. पालकमंत्री ना. अतुल सावे हे शिबिराचे उद्घाटन करणार आहेत. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांची प्रमुख उपस्थिती राहमार आहे. या शिबीरात जनरल मेडिसीन, नेत्रविकार तज्ञ, अस्थि विकार तज्ञ, स्त्रीरोग व प्रसुतीतज्ञ, शल्य चिकित्सक आदी नामांकित डॉक्टर रुग्णांची मोफत तपासणी करतील. तसेच आवश्यकतेनुसार रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया, नेत्र तपासणी शिबीर व मोफत चष्मे वाटप, रक्त, लघवी चाचणी व ई.सी.जी. आदी तपासण्या मोफत करणार आहेत. यावेळी विनामूल्य आयुष्यमान भारत कार्डही काढून देण्यात येणार असून समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास धर्मगुरु बाबुसिंग महाराज (पोहरादेवी), लंगर साहिब गुरुद्वाराचे संत बाबा बलविंदरसिंघजी महाराज, खा.डॉ. अजित गोपछडे, ना. हेमंत पाटील, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंद बोंढारकर, आ. बाबुराव कदम कोहळीकर, माजी आ. अमर राजूरकर, डॉ. संतुकराव हंबर्डे, ॲड. किशोर देशमुख, गंगाधर बडूरे, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, जि. प. च्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, डॉ. वाय. एस. चव्हाण, डॉ. पुरुषोत्तम पवार, उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, प्रकल्प संचालक संजय तुबाकले, डॉ. बी.डी. चव्हाण उपस्थित राहणार आहेत.

## पतंजली योग शिक्षकांचा सन्मान सोहळा संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)** – पत्रकार धोंडोपंत विष्णुपुरीकर, कृष्णा उमरीकर, रविंद्र कुलकर्णी, गिरीश कहाळेकर यांच्या हस्ते जागतिक योग दिनानिमित्त विविध ठिकाणी योग शिकवलेल्या योगशिक्षक व योगशिक्षिकांचा दि. २९ रोजी शाल, प्रशस्तीपत्र व पतंजली अंगवस्त्र प्रदान करून सन्मान करण्यात आला. सर्वश्री पंढरीनाथ कंटेवाड, राम शिवपनोर, सुरेश लंगडापुरे, श्रीमती नंदिनीताई चौधरी, आदींनी पत्रकारांचा सन्मान शाल पतंजली अंगवस्त्र प्रदान करून केला.

अकराव्या जागतिक योग दिवसाच्या निमित्ताने नांदेड पतंजली योगपीठ परिवाराच्या योगशिक्षक व योगशिक्षिकांनी विविध विद्यालय, महाविद्यालय, संस्था, शासकीय ऑफिस, योगवर्ग आदी ठिकाणी प्रोटोकॉल नुसार योगवर्ग घेतला. योगाचे धडे देणाऱ्या योगशिक्षकांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला सर्वश्री रावसाहेब साजने, उर्मिला साजने, अनिल कामिनवार, अशोक कुरुडे, भाग्यश्री असोरे, शुभांगी महात्मे, चित्रा चिमणे, अनिता आठवले, सुरेखा कुलकर्णी, अहिल्या गायकवाड, ताराबाई पवार, विद्या सोरगे, छाया संगणवार, शशिकला पवार, उज्वला जनकवाडे, रामराव जनकवाडे, गोविंद पोळे, गजानन पानपट्टे, मुंजाजी जाधव, यश पानपट्टे, विष्णुदास शिंदे, अनिल कदम, सतीश डोईफोडे, माधव पचलिंगे, रामेश्वर थोटे, जनार्दन आठवले, मोहन देशमुख, हरिहर नरवाडे, एकनाथ पाटील इंगोले, भगवान इंगोले, संतोष दंडे, अनुसया चौधरी, वैजयंता पाठक, सुनिता डांगे, उत्तमराव वट्टमवार, बालाजी कहाळेकर, सुरेखा घोगरे, डॉ. सुनिता वैजवाडे, व्यंकट कोडगिरे, देवेश सलगरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## घरकुलाच्या सर्व्हेकरिता पैशाच्या मागणीचा आरोप

### बाऱ्हाळी ग्रामस्थांकडून कारवाईची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– सरकारने गोरगरीबांसाठी घरकुल योजना सुरू केली. पण त्यासाठी अधिकारी लाच मागत आहेत. मेथी आणि खपराळ (ता. मुखेड) येथील ग्रामसेविका अलका गंगाधरे यांनी प्रति अर्ज १५०० ते २००० पर्यंतची रकम घेऊनच सर्व्हे करत आहेत, अशी तक्रार कृष्णकांत हाणमंत शिंदे व गजानन उत्तम शिंदे यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

विवाहित असेल तर त्याला घरकुल यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी दीड हजार रुपये आणि अविवाहित असेल तर त्याला दोन हजार रुपयांची मागणी होत आहे. अविवाहित लोकांसाठी ही योजना नसूनही पैशांची देवाणघेवाण करून मेथी ग्रामपंचायतीत शंभरपेक्षा जास्त अविवाहित लाभार्थी असल्याचेदेखील आरोप आहेत, याची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

दरम्यान, याबाबत ग्रामसेविकेशी संपर्क साधला असता माझे कोणीही काही करू शकत नाही असे ग्रामसेविका अलका गंगाधरे यांनी असे वक्तव्य करत नागरिकांना थेट आव्हान दिले आहे. या प्रकारामुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट पसरली असून, त्यांनी अशा भ्रष्ट व भ्रष्टाचाराला पाठबळ देणाऱ्या कर्मचाऱ्यावर तत्काळ चौकशी करून कठोर कारवाई, तसेच बडतर्फ करण्याची मागणी केली आहे. हे राजकीय षडयंत्र आहे. माझ्यावरचा आरोप खोटा आहे. मी घरपट्टी वसूल करताना फक्त घरपट्टीच मागितली आहे, असे ग्रामसेविका अलका गंगाधरे यांनी सांगितले.

## सिडको परिसरात नागरी सुरक्षेसह मुलभूत सुविधांसाठी कॉँग्रेसचे निवेदन

**नांदेड (प्रतिनिधी)**– सिडको, हडको भागात मुलभूत सुविधा आणि नागरी सुरक्षा संदर्भातील प्रश्नांकडे कॉंग्रेसने लक्ष केंद्रित केले आहे. दरम्यान कॉंग्रेस जिल्हाप्रवक्ता तथा सिडको कॉंग्रेस प्रभारी बापूसाहेब पाटील यांच्या नेतृत्वात कॉंग्रेस शिष्टमंडळाच्या वतीने गुरुवारी (ता.२६) निवेदने देण्यात आले.



सिडको हडको परिसरातील नागरी सुरक्षेच्या संदर्भात निवेदन ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांना तर मुलभूत सुविधेच्या संदर्भातील निवेदन मनपा सिडको झोनचे सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांना देण्यात आले. यावेळी कॉंग्रेस जिल्हाप्रवक्ते बापूसाहेब पाटील, सिडको वाघाळा ब्लॉक कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष महेश पाटील शिंदे, सिडको ब्लॉक युवक कॉंग्रेस अध्यक्ष प्रसेनजित वाघमारे, अल्पसंख्याक विभाग जिल्हा उपाध्यक्ष लतीफ शेख, सिडको अल्पसंख्याक अध्यक्ष नरुद्दीन शेख, शेख मोईन लाठकर, वार्ड अध्यक्ष देविदास कदम, प्रभू उरुदवाड, देविदास कहाळेकर, माणिक श्रोते आदीसह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

परिसरातील शाळेच्या वेळात पोलीस पेट्रोलिंग करण्यात यावी, आठवडी बाजारा दरम्यान पोलीस बंदोबस्त द्यावा. हडको बसस्थानक एक पोलीस शिपाई किंवा दोन होमगार्ड यांचा नियमित बंदोबस्त द्यावा, अशी मागणी ग्रामीण पोलीस स्टेशनकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

तर नांदेड ऐवजी हडको येथेच घंटा गाड्या मुक्कामी जमा करण्यात याव्यात, जेणेकरून सकाळी त्या वेळेवर उपलब्ध होतील. शैक्षणिक संस्था, प्रार्थना स्थळे, स्मशानभूमी व कबरीस्थान आदी ठिकाणी स्वच्छता ठेवावी. आठवडी बाजाराच्या दिवशी व खाजगी शिकवणीच्या परिसरात पथदिवे सुरु राहावेत याची काळजी घ्यावी. पावसाळा लक्षात घेऊन नाले सफाईस विशेष प्राधान्य द्यावे आदी मागण्यांचे निवेदन महापालिकेच्या सिडको क्षेत्रिय कार्यालयाला देण्यात आले.

## खा. आष्टीकर यांच्या प्रयत्नातून ४ कोटींचा निधी मंजूर

**हदगाव (प्रतिनिधी)**– शहरातील रस्ते विकास, स्वामी समर्थ महाराज मंदिर सभामंडप, लिंगायत समाज स्मशान भूमी विकास आणि भाई बन्सीलाल तोष्णीवाल स्मारक वाचनालय परिसरात उद्यानाच्या विकासासाठी राज्य शासनाने चार कोटी चा निधी मंजूर केला आहे, अशी माहिती खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी दिली आहे.

खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी डिसेंबरमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे व अर्थ मंत्री अजित पवार यांना भेटून वरील कामांसाठी निधीची मागणी केली होती. विशेष रस्ते अनुदान योजनेतून ११ विविध रस्त्याच्या कामांसाठी २ कोटी तर वैशिष्ट्य पुर्ण योजनेअंतर्गत २ कोटींच्या कामाना शासनाने मंजुरी दिली आहे. यातून श्री स्वामी समर्थ मंदिरात सभामंडप, लिंगायत समाज स्मशान भूमीमध्ये निवारा शेड, पाणीपुरवठा व्यवस्था, सुरक्षा भिंतीचे बांधकाम, भाई बन्सीलाल तोष्णीवाल स्मारक वाचनालय परिसरात बगीचा व वृक्षारोपण करण्यात येणार आहेत.

## सिडकोतील कुसुमताई विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

### कठोर परिश्रम केल्याशिवाय ध्येय सिद्धी अशक्य –संभाजीराव बिरादार

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– सिडको येथील कुसुमताई प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शनिवारी (दि. २८) १० वी व १२ वीच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. ध्येय गाठण्यासाठी केवळ स्वप्न पाहणे पुरसे नाही. त्याचा पाठपुरावा करण्याची गरज आहे. कारण कठोर परिश्रम केल्याशिवाय ध्येय सिध्दी होणार नाही, असे प्रतिपादन संस्थेचे सचिव संभाजी बिरादार यांनी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलेत होते.



याप्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून माजी सभापती महिला शिक्षण व बालकल्याण मनपा नांदेड सौ. सवीता कंठेवाड व सिद्धेश्वर मुंढे यांची उपस्थिती होती. सचिव संभाजी बिरादार म्हणाले की, शाळेत विद्यार्थ्यांना शिक्षक मार्गदर्शन करीत असतात, त्यासोबतच पालकांनीही जागरूक राहण्याची गरज आहे.

प्राचाया शशिकला जाधव–बिरादार यांनी मुलांचा गौरव करीत त्यांचे कौतूक केले. साहित्यिक शेख निजाम गवंडगावकर, प्रा.अंगद केंद्रे, प्रा. भागवत हरे, पर्यवेक्षिका सौ. उज्वला सावते यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कुसुमताई शाळेतील ७८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ६९ विद्यार्थ्यांना विशेष प्राविण्य तर शाळेचा ९५ टक्के निकाल लागला आहे. यात लोखंडे ओमकार ९६.६०%, आढाव अनुजा ९४.४०%, इंदुलकर हर्ष ९४.००% तर १२ वीचे गुणवंत अनुक्रमे कला शाखेचे एडके प्रतिमा ९७.५०% मोरे सुजाता ७०.८३%, बिंगेवार गायत्री ७०.६७% तर विज्ञान प्रतिक्षा मुंढे ८७.८३%, अक्षय शिंदे ८७.६७% आयचीत वर्धीत ८४.१७% गुण मिळविले.

कार्यक्रमासाठी सुर्यकांत वडजे, सतीश जाधव, शंकर पाटील, माधव जाधव, नर्सिंग यलमलवाड, लक्ष्मण येसके, सौ.वंदना सोनाळे, सौ. माधुरी माकणे, सौ.सुनीता कोरे, सौ.किरण भालेराव, प्रा.ज्ञानेश्वर पांचाळ, प्रा. संगीता मांजरे, प्रा. वैशाली गायकवाड, प्रा.रूपाली मिरगेवाड, प्रा. अश्वीनी आडे यांनी परिश्रम घेतले. विश्वास हंबर्डे यांनी सूत्रसंचालन केले. पद्मजा कुलकर्णी यांनी प्रास्ताविक तर सागर पाटील यांनी आभार मानले.

## सेवालालनगर तांडा शेवडी (बाजार) ग्रामपंचायतीची स्वतंत्र दर्जा बहाल

**नांदेड (प्रतिनिधी)**– लोहा तालुक्यातील शेवडी बाजारपासून ४ कि.मी. अंतरावर असणाऱ्या सेवालालनगर तांडा यास स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा मिळाला आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला आहे.



जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय आयुक्तांनी उपसचिव ग्रामविकास विभागीय यांच्याकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केलेला होता. प्राचार्य शंकरराव राठोड जिल्हाध्यक्ष, विजाभज आघाडी भारतीय जनता पार्टी नांदेड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्याकडे गेल्या ८– ९ महिन्यांपासून पाठपुरावा करून शासनाकडे पाठपुरावा केला होता.

लोहा तालुक्यातील बहुचर्चित शेवडी बा पासून ४ कि. मी. अंतरावर असलेल्या २१०० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या मोठ्या तांड्यास मा. मंत्री ग्रामविकास व पंचायतराज मा. जयकुमार गोरे, प्रधान सचिव एकनाथ डावले यांच्याकडे वारंवार पाठपुरावा केला होता. जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्याकडेही स्वतंत्र ग्रामपंचायत मान्यतेसाठी आग्रह धरला होता.

अखेर शासन निर्णय क्र–व्हीपीएम २०२४ /प्र.क्र. १३८/ पंरा–४/२२ दिनांक २५ जून २०२५ रोजी अन्वये अधिकृत शासनाची मान्यता मिळाल्यामुळे बांधकाम भवन मुंबई येथे स्वतः प्राचार्य शंकरराव राठोड यांनी ग्राम विकास विभागाचे उपसचिव विनोद बोंदरे व डॉ. स्नेहल लोखंडे कक्ष अधिकारी यांचे आभार मानले.

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार

# जिवघेणा धनुर्वात!

**धनुर्वात (टिटॅनस) हा जनावरे आणि मानवाच्या मज्जातंतूंना जडणारा विषजन्य आणि जीवघेणा आजार आहे. हा आजार टेटॅनस टॉक्सीन विषामुळे होतो. क्लोस्ट्रिडियम टिटॅनी हे जिवाणू माती तसेच बहुतांश प्राण्यांच्या आतड्यांमध्ये असतात. माती, धूळ आणि गंजलेल्या टोकदार वस्तूंवर जिवाणू किंवा त्यांचे बीजाणू मोठ्या संख्येने दिसून येतात.**

जखमेचा संपर्क माती, धुळीसोबत आल्यास किंवा गंजलेल्या लोखंडाच्या वस्तूने जखम झाल्यास जिवाणू संसर्ग होऊ शकतो. क्लॉस्ट्रिडियम टेटानी या जिवाणूंचा संसर्ग झाल्यास जिवाणू वाढीदरम्यान टेटॅनस टॉक्सीन विष तयार करतात. या विषाचा थेट परिणाम मज्जातंतूंवर होतो. विशेषकरून चेहरा व इतर स्नायू आखडले जातात. म्हणून या आजारास लॉकजॉ असे म्हणतात. कोणत्याही प्रकारची जखम तसेच अगदी साध्या ओरखड्यातून हे जिवाणू शरीरात आत शिरू शकतात. हे जिवाणू प्राणवायूच्या संपर्कात वाढू शकत नाहीत. मात्र स्नायूंमधील प्राणवायू विरहित वातावरणात जिवाणूंची वाढ सहज होते. ऐच्छिक स्नायूंना आकडी येऊन ते ताठरणे हे या आजाराचे वैशिष्ट्य आहे. याचे संक्रमण बाधित प्राण्याच्या संपर्कातून, खाद्य, पाणी तसेच हवेतून होत नाही. गाय, कुत्रा, मांजर आणि वराहामध्ये या आजाराला प्रतिकार करण्याची शक्ती जास्त असते. मात्र शेळ्या, मेंढ्या, घोडा व मनुष्यामध्ये संसर्ग जास्त प्रमाणात आढळतो. नवजात पिलांमध्ये नाळ कापताना झालेल्या संसर्गातून तत्काळ संक्रमण होऊन धनुर्वात उद्‌भवू शकतो.



## आजाराची लक्षणे...

जिवाणू संसर्ग झाल्यानंतर आजार होण्याचा कालावधी तीन ते एकवीस दिवसांच्या दरम्यान असू शकतो. जिवाणूंचा उबवण काळ साधारणपणे दोन दिवस ते दोन आठवडे असतो; परंतु काही वेळा हा काळ तीन महिन्यांचा असू शकतो. हा काळ जेवढा अधिक तेवढा आजार सौम्य असतो. शरीरात जिवाणूंनी प्रवेश केल्यानंतर ३ ते १४ दिवसांत आजाराची लक्षणे दिसू लागतात. जिवाणू स्नायूंमध्ये वाढत असताना टेटॅनोस्पाझ्मीन हे घातक विष उत्सर्जित करतात. विषाच्या प्रमाणानुसार आणि बाधित जनावराच्या प्रतिकार क्षमतेनुसार आजाराची तीव्रता ठरते. ज्या ठिकाणी हे जिवाणू शरीरात प्रवेश करतात आणि वाढतात, त्या ठिकाणापासून विष रक्तप्रवाहात मिसळून चेतापेशींपर्यंत पोहोचून चेतापेशींना इजा करते. विषाचा परिणाम मेंदू, मज्जासंस्था तसेच पाठीच्या कण्यावर होतो. नसा काम करणे बंद करतात. परिणामी, स्नायूंची हालचाल बंद होते. स्नायू आखडतात. जनावराला हालचाल करता येत नाही. जनावर खाली पडते. जबडा उघडता व बंद करता येत नाही. पाणी पिणे, खाद्य खाणे बंद होते. आजाराच्या सार्वदेहिक प्रकारात शरीरातील सर्व स्नायू आकुंचन पावतात. स्थानिक धनुर्वातामध्ये जखमेलगतचे स्नायू आकुंचन पावतात. योग्य उपचार वेळेत न मिळाल्यास मृत्यू येतो.

## घोड्यांमधील लक्षणे...

कान आणि शेपटी ताठर आणि उंच होते. नाकपुड्या रुंद होतात. डोळ्यातील तिसरी पापणी आकुंचन पावते. चालणे, वळणे, आणि मागे येणे कठीण होते. मान आणि पाठीच्या स्नायूंना उबळ येते. पायांचे स्नायू ताठर होतात. घोडा चारही पाय ताठ फाकवून करून उभा राहतो. घाम येतो. इतर अवयवांच्या स्नायूंची उबळ रक्त प्रवाह आणि श्वासोच्छ्वासास अडथळा निर्माण करतात. हृदयाची आणि श्वासोच्छ्वाची गती वाढते. श्लेष्म त्वचा लाल होतात. श्वासोच्छ्वास बंद पासून ८० टक्के बाधित घोडे मृत्यू पावतात.

## जनावरांतील लक्षणे...

जनावरे, शेळ्या आणि मेंढ्यांमध्ये सुरुवातीस ताठरपणा येतो. चालता येत नाही. स्नायूंना मुरळ आणि उबळ येते. चेहऱ्याचे स्नायू आखडले जातात. डोळ्याची तिसरी पापणी लक्षणीयरीत्या बाहेर येते. चाल अस्थिर होते तसेच शेपटी ताठर आणि उंच होते. बाधित जनावर चिंताग्रस्त आणि अति उत्साही होते. रवंथ करणे बंद होते. पोट फुगते. जनावर खाली पडते, पाय ताठर होतात. स्नायू आकडतात, मृत्यू येतो.

## श्वान, मांजरांमधील लक्षणे...

स्थानिक धनुर्वात जास्त प्रमाणात आढळून येतो. बाधित श्वानांमध्ये पाय, जखमेच्या भोवतालच्या स्नायू कडक होतात. स्नायू आकुंचन पावतात, थरथरतात. स्थानिक धनुर्वाताचे रूपांतर व्यापक आणि सार्वदेहिक प्रकारात होण्याची शक्यता असते. सार्वदेहिक धनुर्वातात शरीराचे विविध भाग प्रभावित होतात. बाधित जनावर ताठ चालते. शेपटी उंच आणि ताठ होते. प्राण्यांना वाकता येणार नाही एवढा ताठरपणा शरीरात येतो. चेहऱ्याचे स्नायू बाधित होतात. डोळ्याची तिसरी पापणी सुजून येते. स्नायूमध्ये उबळ आल्याने कपाळावर आठ्या पडतात. ओठ मागे खेचले जातात. जबडे बंद होतात. गिळता येत नाही. लाळ जास्त प्रमाणात गळते. बाधित स्नायू दुखतात आणि जीवघेणा ताप येतो. बद्धकोष्टता येते. लघवीस त्रास होतो. कंठावर उबळ येऊन श्वसनास त्रास होते. हृदयाचे स्पंदने आणि रक्त दाब कमी जास्त होतो, मृत्यू येण्याची शक्यता बळावते.

## निदान, प्रतिबंध आणि नियंत्रण...

लक्षणांवरून हा आजार सहज ओळखता येतो. प्रयोगशाळेत सूक्ष्मदर्शकाखाली जिवाणू पाहून निदान करतात. आजाराच्या निदानाची सेवा विद्यापीठाच्या सर्व पशुवैद्यकीय महाविद्यालयांमध्ये उपलब्ध आहे. जनावरांमध्ये विशेषतः घोड्यांमध्ये टेटॅनस टॉक्सोइडचे (टी.टी.) लसीकरण करावे. गाभण जनावरांना धनुर्वाताची लस द्यावी. त्यामुळे मातेकडून अर्भकांना प्रतिकारशक्ती प्राप्त होते. अर्भकांना धनुर्वात होत नाही. लसीकरणामुळे नवजात अर्भकांमध्ये मृत्यूच्या प्रमाणात लक्षणीय घट होते. जखम झाल्यास, ती स्वच्छ करावी. जखम धुण्यासाठी योग्य प्रतिजैविकांचा वापर करावा. गोठ्यांची स्वच्छता ठेवावी. जिवाणूंची संख्या कमी करण्यासाठी पशुवैद्यकाच्या सल्ल्याने प्रतिजैविकाचा वापर करावा. जखमी प्राण्यास धनुर्वाताच्या निर्विषीकरणाची लस द्यावी. जनावरांना जखमा होऊ नये यासाठी दक्षता घ्यावी.



# ...तर शेळी, मेंढ्यांना आंत्रविषार आजार!

**पावसाळ्यामध्ये सगळीकडे हिरवेगार लुसलुशीत कोवळे, गवत दिसायला लागते. हे गवत जर जास्त प्रमाणात शेळी, मेंढीने खाले तर त्यांना आंत्रविषार आजाराची शक्यता असते. मेंढ्या आणि शेळ्यांचे संगोपन, व्यवस्थापन पद्धतीमध्ये काही महत्त्वाचे फरक आहेत.**

आंत्रविषार आजार क्लोस्ट्रिडियम परफ्रिन्जेन्स (प्रकार डी) जिवाणूमुळे होतो. हा आजार सर्व वयोगटातील मेंढ्या आणि शेळ्यांना (एका आठवड्यापासून ते मोठ्या वयापर्यंत) होऊ शकतो. शेळी, मेंढीला चाऱ्याला सोडले असताना किंवा उच्च दर्जाचे गवत किंवा धान्य जास्त प्रमाणात खाद्यामध्ये आले तर हा आजार होतो. या आजारामध्ये साधारणतः मृत्यूचे प्रमाण १० ते ४० टक्क्यांपर्यंत आढळते. आंत्रविषार हा एक अतिशय महत्त्वाचा आजार आहे. काही भागांत तो शेळ्यांमध्ये सर्वात जास्त प्रमाणात दिसतो. या आजाराचे कारण म्हणजे क्लॉस्ट्रिडियम परफ्रिन्जेन्स टाइप सी किंवा टाइप डी या जिवाणूद्वारे तयार केलेल्या विषांद्वारे होतो. बहुतेक प्राण्यांच्या आतड्यात क्लॉस्ट्रिडियम परफ्रिन्जेन्स हा जिवाणू कमी प्रमाणात असतो. मोठ्या प्रमाणात आणि उच्च दर्जाच्या आहारामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत, जिवाणू वेगाने वाढून एक शक्तिशाली विष तयार करतात. हे विष आतड्याच्या आतून शोषले जातात आणि काही तासांत शेळ्या आणि मेंढ्यांचा मृत्यू होतो.

### आंत्रविषार होण्याची कारणे

- जनावरांच्या आहारात अचानक बदल होणे.
- खूप जास्त प्रमाणात कार्बोहायड्रेट देणे.
- स्टार्च आणि शर्करा नसलेला आहार देणे.
- अनियमित आहार देणे.
- आहाराचे प्रमाण खूप वेगाने वाढवणे.
- प्राण्यामध्ये परजीवी प्रमाण असणे.
- आतड्यात मोठ्या प्रमाणात न पचलेले किंवा अंशतः पचलेले अन्नामुळे आतड्यांमध्ये विष तयार होते.
- नैसर्गिक रोग प्रतिकारशक्तीचा अभाव असणे.

### आजाराचे निदान

जेव्हा क्लोस्ट्रिडियम परफ्रिन्जेन्स (प्रकार डी) लसीकरण न केलेल्या जनावरांमध्ये अचानक मृत्यू होतो तेव्हा आंत्र विषाराचे निदान केले जाते. जनावरांचे शवविच्छेदन चाचणी देखील आजार कळण्यास मदत करू शकते. जर मृत्यूनंतर तत्काळ किंवा त्वरित शवविच्छेदन केले गेले, तर काही बदल लक्षात येऊ शकतात, विशेषतः जनावरांचा अचानक मृत्यू झाल्यास तेव्हा त्यात सामान्यतः फुफ्फुसातील रक्तसंचय आणि द्रवपदार्थ आणि जिलेटिनस सामग्रीच्या (फायब्रिन) गुठळ्या असलेल्या हृदयाच्या थैलीमध्ये (पेरीकार्डियल सॅक) द्रव पदार्थात वाढ झालेली असते. हृदयाच्या बाहेरील आणि आतील स्नायूंच्या भिंतींवर रेषा असलेल्या स्पष्ट पडद्याच्या खाली लहान रक्तस्राव आणि रक्त स्प्लॅश दिसून येतो. मूत्रपिंडाच्या उती द्रवाने भरतात. वेगाने खराब होऊ शकतात.

### उपचार काय ?

आंत्रविषार आजार अल्पमुदतीचा असल्याने यावर कोणताही प्रभावी उपचार नाही. बाधित जनावराला पशुवैद्यकाच्या सल्ल्यानुसार प्रतिजैविके द्यावीत. शेळ्या-मेंढ्याचे पावसाळ्यापूर्वी आंत्रविषार नियंत्रणासाठी लसीकरण करून घ्यावे. तीन महिन्यांवरील कोकरे आणि करडांना लस द्यावी.



त्यानंतर तीन आठवड्यांनी बूस्टर डोस द्यावा. प्रौढ शेळ्या-मेंढ्याचे नियमितपणे वर्षातून दोन वेळा लसीकरण करावे.

### आजाराची लक्षणे...

- कोकरू आणि करडामध्ये आंत्रविषार आजाराची बाधा होण्याचे प्रमाण जास्त असते. या आजाराची लक्षणे शेतकऱ्यांच्या लक्षात येईपर्यंत बाधित जनावरांचा मृत्यू होतो.
- आंत्रविषारामुळे होणारे मृत्यू सहसा अचानक होतात. प्रादुर्भाव झाल्यापासून १२ तासांत करडांचा मृत्यू होतो. काही जनावरांमध्ये मरण्यापूर्वी कित्येक तास किंवा एक दिवस किंवा त्याहून अधिक काळ आजारी लक्षणे दिसतात.
- कोकरू सुस्तपणे एका ठिकाणी बसून राहतात. कोकरांमध्ये हातपाय ताठ होणे, आक्षेपार्ह हालचाली, मेंदूशी संबंधित लक्षणे, अतिसार, करडे दूध पिणे बंद करतात.
- करडांनी हिरव्या रंगाची पातळ हगवण होते. तोंडाजवळ फेस येतो. बाधित करडे हवेत उड्या मारून जमिनीवर पडतात. अशी लक्षणे विशेषतः शेळ्यांमध्ये दिसतात.
- लक्षणे आंत्रविषाराशी सूचक असली, तरी ती इतर आजारांमध्ये देखील दिसू शकतात ज्यामुळे अचानक मृत्यू होतो, जसे की अक्युटेसिडोसिस किंवा ग्रेन फाउंडर, पोलिओ एन्सेफॅलोमॅलेशिया, लिस्टिरिओसिस, तीव्र पेस्ट्युरेलोसिस, टिटॅनस आणि ब्लॅकलेग. अशा मृत्यूची कारणे त्वरित आणि योग्यरीत्या निदान करणे महत्त्वाचे आहे.

# शेळ्यांचे पावसाळ्यातील व्यवस्थापन

**गरिबांची गाय म्हणून शेळीला ओळखले जाते. शेळीपालन व्यवस्थापनात सर्वांत जास्त काळजी ही गोठ्यातील आर्द्रता नियंत्रित राखण्यासाठी घ्यावी लागते. कारण शेळ्यांना जास्त आर्द्रता सहन होत नाही. त्यामुळे त्यांना श्वसनसंस्थेचे आजार होण्याची दाट शक्यता असते. पावसाळ्यात आर्द्रतेचे प्रमाण निश्चितच जास्त असते. त्यामुळे व्यवस्थापन तंत्रात त्यानुसार बदल करणे गरजेचे असते. पावसाळ्यात शेळीचा गोठा स्वच्छ कोरडा ठेवावा. खाद्य, प्रजनन तसेच गाभण शेळी व करडांची निगा, लसीकरण या सर्व बाबींचे काटेकोर नियोजन करावे.**



### घ्यावयाची काळजी

**पावसाळा सुरू होण्यापूर्वी शेळ्यांना जंतनाशकांच्या मात्रा देणे अत्यंत आवश्यक आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीचा काळ हा जंताची अंडी आणि गोचिड यांच्या वाढीसाठी अत्यंत अनुकूल असतो. गोचीड शेळ्यांच्या शरीरातील रक्त शोषण करतात. त्यामुळे शेळ्या अशक्त होतात. त्यांच्या अंगावर खाज सुटते. अशावेळी शेळ्या बैचेन होतात, चारा खाणे बंद करतात, त्यांची हालचाल मंदावते. त्यासाठी शेळ्यांच्या अंगावर गोचीडनाशक औषध लावावे.**

- पावसाळ्यात गोठ्यातील आर्द्रता वाढते. शेळ्या उष्णता सहन करू शकतात. मात्र आद्रता नाही. गोठ्यातील आर्द्रता कमी ठेवण्यासाठी रात्रीच्या वेळी शेगडी किंवा ६० वॉटचा बल्ब लावून उष्णता निर्माण करावी.
- गोठ्यातील जमीन ओली राहिल्यामुळे शेळ्यांच्या पायांच्या खुरांमध्ये ओलसरपणा राहून पायाला फोड येतात. त्यामुळे शेळ्या लंगडतात, ताप येतो, चारा कमी खातात आणि अशक्त होतात. योग्य वेळी उपचार न केल्यास शेळ्या दगावण्याची शक्यता असते. गोठ्यातील मलमूत्र दररोज बाहेर काढून गोठा कोरडा ठेवावा.
- पडत्या पावसामध्ये शेळ्यांना बाहेर चरायला सोडू नये. पावसात भिजल्यामुळे शेळ्यांना न्यूमोनियासारखा आजार होण्याची शक्यता असते. यामुळे शेळ्या शिंकतात, नाकातून चिकट पांढरा पिवळसर द्रव वाहतो, ताप येतो, धाप लागते आदी लक्षणे दाखवितात.
- - पावसाळ्यात उगवलेला कोवळा हिरवेगार गवत शेळ्या अधिक प्रमाणात खाणार नाहीत याची काळजी घ्यावी. अशा चाऱ्यामध्ये तंतुमय पदार्थ कमी असतात, त्यामुळे अपचन, पोटफुगी, हगवण असा त्रास उद्‌भविण्याची शक्यता असते.

### लसीकरण महत्त्वाचे...

**पावसाळ्यात शेळ्यांना प्रामुख्याने विविध जिवाणू, विषाणू आणि परजीवी कृमी यांच्यामुळे विविध आजार होतात. बदलते हवामान आणि खाद्यतील पोषक तत्वांच्या अभावामुळे विशेषतः करडे लवकर आजारास बळी पडतात. लहान करडांमध्ये हगवणीचा त्रास वारंवार दिसून येतो. त्यासाठी करडांची खाद्य पाणी आणि आरोग्याची योग्य निगा राखणे आवश्यक आहे.**

- शेळ्या व करडांना आंत्रविषार, फुफ्फुसदाह, लाळ्या खुरकूत, घटसर्प व फऱ्या या आजारांचे प्रतिबंधात्मक लसीकरण करून घ्यावे.
- पावसाळ्यात शेळ्यांना धनुर्वात होण्याची जास्त शक्यता असते. त्यासाठी धनुर्वाताचे इंजेक्शन पशुवैद्यकीय तज्ज्ञांकडून द्यावे.
- गाभण शेळीची पावसाळ्यात योग्य प्रकारे काळजी घ्यावी. कारण पावसाळ्यात गोठ्याची जमीन ओलसर राहल्यामुळे चालताना घसरून पडून गर्भपात होण्याची शक्यता असते. त्यासाठी गाभण शेळ्यांचे स्वतंत्र योग्य निवाऱ्याखाली आणि कोरड्या ठिकाणी व्यवस्थापन करावे.
- पावसाळ्यात शेळ्या विण्याचे प्रमाण अधिक असते. या काळात गर्भाशयाचे तोंड उघडे असते. योनीभाग व बाजूचा भाग स्वछ नसेल तर गर्भाशयात जंतूंचा शिरकाव होण्याची शक्यता असते. हे टाळण्यासाठी विल्यानंतर पाठीमागचा भाग गरम पाणी व सौम्य जंतुनाशकाने स्वच्छ धुऊन कोरडा करावा.
- नवजात करडांना जन्मानंतर २४ तासांच्या आत चीक किंवा दूध पाजणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना रोगप्रतिकारक शक्ती व ऊर्जा मिळते. त्यांची पचनसंस्था साफ होण्यास मदत होते.

### आहार नियोजन

- शेळ्यांच्या शारीरिक स्थितीनुसार आवश्यक हिरवा आणि वाळलेला चारा तसेच संतुलित खुराक द्यावा.
- पावसाळा सुरू होण्याच्या दोन आठवड्यापूर्वी मेंढी - शेळ्यांना त्यांच्या वजनानुसार हिरव्या चाऱ्यासोबत संतुलित खुराक दिल्यास पावसाळ्यात त्यांची प्रतिकार शक्ती उत्तम राहील.
- कोरडा चारा आणि इतर खाद्याची साठवण योग्य ठिकाणी करणे आवश्यक आहे कारण त्यास बुरशी लागण्याची शक्यता असते.
- चाटण वीट किंवा खुराकामध्ये खनिज मिश्रण सुरू ठेवणे गरजेचे असते कारण शेळ्या किंवा करडे खनिजांच्या अभावामुळे माती चाटतात. खानिजाच्या अभावामुळे इतर आजार होतात.
- कोवळ्या चाऱ्यात तंतुमय पदार्थ कमी असतात. जर असा चारा जास्त खाऊ घातला तर त्यांना अपचन होण्याची शक्यता जास्त असते.



- पोटफुगी, हगवण यांसारखे आजार होतात. तज्ज्ञांच्या सल्ल्याने उपाययोजना कराव्यात.
- बोकडांना देखील पावसाळा सुरू होण्यापूर्वी पंधरा दिवस तीनशे ते साडेतीनशे ग्रॅम प्रतिदिन खुराक दिल्यास वीर्याचे प्रमाण आणखी सुधारते.
- चारा कुट्टी करून खायला दिल्याने जमिनीवर चारा पडून तो खराब होत नाही.
- पावसाळ्यात शेळ्या, मेंढ्यांना दिले जाणारे पाणी स्वच्छ असावे.

# पावसाळ्यात गोठ्यात काय बदल कराल?

जनावरांच्या गोठ्याचा मुख्य हेतू त्यांचे ऊन, वारा आणि पाऊस यांच्यापासून संरक्षण करणे असते. दुधाळ जनावरांसाठी गोठा मोकळा, हवेशीर आणि आरामदायी असला पाहिजे. पावसाळ्यात गोठ्याच्या छप्परातून पावसाचे पाणी गळत असल्यास, गोठ्यात पाणी साचू लागते. जनावरे बसण्याच्या जागी खाचखळगे असल्यास, त्यात जनावरांचे मलमूत्र साचून राहते. विशेषकरून पावसाळ्याच्या दिवसात जनावरांना गोठ्यातच बांधून ठेवले जाते. पावसाचे पाणी आत येऊ नये यासाठी गोठे पूर्णपणे बंदिस्त केले जातात. गोठ्यात हवा कोंडली जाते. परिणामी गोठ्यात मोकळी स्वच्छ हवा आत येत नाही. याचा परिणाम म्हणून जनावरांवरती ताण येत असतो. गोठ्यात जनावरे बसण्याच्या जागी जास्त ओलावा असल्यास जनावरे खाली बसत नाहीत. जनावरे उभे राहूनच रवंथ करतात. जनावरे सतत उभे राहिल्याने त्यांच्या शरीरावर एक प्रकारचा ताण येतो. ऊर्जेचा अपव्यय होतो. या सर्वाचा परिणाम दूध उत्पादनावर झालेला दिसून येतो. गोठ्यातील वातावरण जास्त वेळ ओलसर राहिल्यास, अशा ठिकाणी जिवाणू, विषाणू आणि परोपजीवींची वाढ मोठ्या प्रमाणात होत असते. परिणामी जनावरे आजारी पडण्याचे प्रमाण वाढते. हे सर्व टाळण्यासाठी गोठ्याचा परिसर स्वच्छ ठेवावा. पावसाळा सुरू होण्यापूर्वी गोठ्याचे छप्पर दुरुस्त करून घ्यावे. पाऊस उघडल्यावर जनावरे सकाळी बाहेर सूर्यप्रकाशात बांधावीत. मलमूत्राची व्यवस्थित विल्हेवाट लावताना संपूर्ण गोठा व्यवस्थित स्वच्छ करून घ्यावा.

# रस्ते, मेट्रो, सिंचनासारख्या पायाभूत प्रकल्पांची निर्मिती; कुंभमेळ्याचे नियोजन

## मागास घटकांच्या विकासासाठी ५७ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर

**मुंबई (प्रतिनिधी)** – विधीमंडळाच्या जून २०२५ च्या पावसाळी अधिवेशनात उपमुख्यमंत्री तथा राज्याचे वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या विधीमंडळात सादर केल्या. हा निधी प्रामुख्याने राज्यात रस्ते, मेट्रो, सिंचन योजनांसारख्या पायाभूत प्रकल्पांसाठी, सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन व अंमलबजावणी, महात्मा जोतिराव फुले आरोग्य योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, मागास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तसेच दुर्बल, वंचित समाजघटकांच्या विकासासाठी उपयोगात आणण्यात येणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या पुरवणी मागण्यांपैकी १९ हजार १८३ कोटी ८५ लाख रुपये अनिवार्य तर ३४ हजार ६६१ कोटी ३४ लाख रुपये कार्यक्रमांतर्गत आणि ३ हजार ६६४ कोटी ५२ लाख रुपये केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने पुरवणी मागण्या आहेत. स्थूल पुरवणी मागण्या ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या असल्या तरी त्याचा प्रत्यक्ष निव्वळ भार हा ४० हजार ६४४ कोटी ६९ लाख रुपयांचा आहे.

उपमुख्यमंत्री तथा राज्याचे वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्यांपैकी सर्वाधिक ११ हजार ४२ कोटी ७६ लाख रुपये हे पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार अनुदानांसाठी खर्च होणार आहेत. ३ हजार २२८ कोटी ३८ लाख रुपये हे मेट्रो प्रकल्प, महापालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा यांच्या मुद्रांक शुल्क अधिभार परताव्यापोटीचे आहेत. राष्ट्रीय सहकार विकास निगम (एनसीडीसी) यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत सहकारी सहकारी साखर कारखान्यांना खेळत्या भागभांडवलासाठी मार्जिन मनी लोनसाठी २ हजार १८२ कोटी ६९ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

# ट्रॅक्टर खरेदीसाठी दीड लाख रुपयांचे अनुदान मिळणार; राज्य सरकारची घोषणा




**मुंबई (प्रतिनिधी)**–राज्यात इलेक्ट्रिक ट्रॅक्टरच्या विक्रीला चालना मिळावी म्हणून राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांनी त्यांच्या कामासाठी जर इलेक्ट्रिक ट्रॅक्टरची खरेदी केली तर त्यांना दीड लाख रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या खर्चात कपात व्हावी आणि त्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी हा निर्णय घेतला आहे.

राज्यातील इंधनाच्या किमती दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना शेती परवडेनाशी झाली आहे. वाढत्या डिझेलच्या खर्चामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चातही मोठी वाढ होत आहे. पण तुलनेने उत्पन्न मात्र तेवढं मिळत नाही. त्यामुळेच शेतकऱ्यांना इलेक्ट्रिक ट्रॅक्टरवर अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे अनुदान दीड लाख रुपये इतके आहे.

डिझेलचे दर वाढत असल्याने शेतकऱ्यांना शेतीची मशागत महागात पडत आहे. त्यामुळे राज्य सरकारने शेतकऱ्यांना इलेक्ट्रिक ट्रॅक्टर वापरण्याचे आवाहन केले आहे. त्यासाठी सरकारने शेतकऱ्यांना दीड लाख रुपयांची सबसिडी देखील देणार आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, इलेक्ट्रिक ट्रॅक्टरने शेतीमध्ये नवीन क्रांती होईल. शेतकऱ्यांनी जर इलेक्ट्रिक ट्रॅक्टर खरेदी केले तर त्यांना राज्य सरकार दीड लाख रूपयांची सबसिडी देखील देणार आहे. यासोबतच राज्य सरकारच्या अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत ट्रॅक्टर खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना व्याजमुक्त कर्ज देखील दिले जाईल.

# दोन लाखांच्या बनावट नोटांसह तिघांना अटक

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– राहुरी पोलिसांच्या पथकाने शनिवारी मध्यरात्री शहराच्या हद्दीत मोठी कारवाई करत दोन लाख रुपयांच्या २०० व ५०० रुपयांच्या बनावट नोटा घेऊन आलेल्या तीन आरोपींना सापळा लावून त्यांच्या मुसक्या आवळल्या. त्यांच्या ताब्यातून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अहिल्यानगर येथून तीन इसम बनावट नोटा घेऊन दुचाकीवर राहुरीकडे येत असल्याची गुप्त माहिती राहुरीचे पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांना शनिवारी दि. २८ जून रोजी रात्री ११ वाजण्याचे दरम्यान मिळाली. सदर माहितीच्या अनुषंगाने संजय ठेंगे यांनी ताबडतोब एक पोलिस पथक बरोबर घेऊन राहुरी शहरातील नगर मनमाड रस्त्यावर गाडगे महाराज आश्रम शाळा परिसरात सापळा लावला. काही वेळाने तेथे एम एच ४५ वाय ४८३३ क्रमांकाच्या दुचाकीवर तिन इसम आले असता, पोलिस पथकाने त्यांना जागेवरच झडप घालून पकडले. पथकाने त्यांची अंग झडती घेतली असता त्यांच्या जवळ २ लाख रुपयांच्या २०० व ५०० रुपयांच्या बनावट नोटा आढळून आल्या.हवालदार सुरज गायकवाड यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलिस ठाण्यात आरोपी पप्पु ऊर्फ प्रतीक भारत पवार, वय ३३ वर्षे, रा. अर्जुन नगर, ता. करमाळा, जि. सोलापुर, तसेच राजेंद्र कोंडीबा चौघुले, वय ४२ वर्षे, तात्या विश्वनाथ हजारे, वय ४० वर्षे, दोघे रा. पाटेगांव, ता. कर्जत जि. अहिल्यानगर या तिघांवर गुन्हा रजि. नं. ७२४/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १७९, १८०, ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

# तुटलेल्या विद्युतभारीत तारांपासून स्वत:ला जपा –महावितरण

**नांदेड (प्रतिनिधी)** – महावितरण नांदेड परिमंडळ अंतर्गत नांदेड, परभणी व हिंगोली जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला आहे. पावसाळ्यात शेतात, घरात, आसपास काम करताना तुटलेल्या विद्युत तारांचा 'शॉक' अनेकांच्या जीवावर बेतत आहे. याबाबत महावितरणने दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे केली तर दुर्घटना सहज टाळता येतील.

अलीकडेच विजेचा धक्का बसून बैलाचा/गाईचा मृत्यू झाला तर शेतकरी बचावला. अशा अनेक घटना पावसाळा सुरू झाल्यानंतर घडतात. म्हणून अशा घटना घडून वित्त व जीवहानी होऊनये म्हणून आपणच स्वतः नियम पाळत काळजी घेतली पाहिजे. वीज वापरताना योग्य काळजी घेतली नाही, तर विद्युत अपघात घडून नुकसान होवू शकते. सर्वांनी सुरक्षिततेचे नियम पाळले तर हे अपघात टाळता येतात..

वीज अपघात टाळण्यासाठी दर्जेदार उपकरणांचा वापर, प्रमाणित ठेकेदारांकडूनच विद्युतीकरणाची कामे करून घ्यावीत. योग्य क्षमतेचे एमसीबी (मिनिएचर सर्किट ब्रेकर) वापरावेत जेणेकरून अतिभार किंवा शोर्टसर्किटमुळे धोका निर्माण होणार नाही. योग्य प्रकारची अर्थिंग न केल्यामुळे अनेक अपघात घडल्याचे पुढे आले आहेत. त्यामुळे वायरिंग इन्स्टॉलेशनसाठी कॉपर प्लेट किंवा कॉपर रॉडची अर्थिंग कार्यक्षमपणे घेणे सुरक्षेच्या दृष्टीने गरजेचे आहे. इन्सुलेटेड वायरचा उपयोग, पावसाळ्यात मीटर रूम मध्ये पाणी जाणार नाही, त्याचबरोबर भिंती ओल्या होणार नाहीत याची काळजी घ्यावी. मेन स्विचचा वापर, पंखे, इस्त्री, कुलर वापरताना त्यात वीज प्रवाह उतरू शकतो याची जाणीव ठेवूनच सावधानतेने ती हाताळावीत अशा सूचना वेळोवेळी महावितरणकडून दिल्या जातात.

कधीही वीजतारांना हातांनी स्पर्श करू नका. पावसामुळे किंवा वादळ वाऱ्यामुळे जर एखादी तार खाली आली असेल तर त्वरित महावितरणच्या निर्दर्शनास आणून या वायरच्या जवळ जाणे टाळा. कारण खाली आलेल्या वायरमधून बऱ्याच वेळेला विद्युत प्रवाह सुरू असतो. जास्तीत जास्त अपघात व मृत्यू फक्त तारेला किंवा वापरला स्पर्श झाल्यामुळे होतात. तांत्रिकदृष्ट्या वायरचा जमिनीला स्पर्श होताक्षणी आर्थिंग होऊन पूर्ण वीज पुरवठा खंडित होणे अपेक्षित असते. मात्र, काही वेळेस हा पुरवठा खंडित होत नाही आणि याच तारा जीवघेण्या ठरतात.


## टी.सी.हरवली

माझी अब्दुल सलीम अब्दुल अजीज या नावाची बी.ए. पास ची टी.सी.देगलूर नाका ते रेल्वेस्टेशन ऑटोने प्रवासन करतांना हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

**–संपर्क पत्ता–**
**अब्दुल सलीम अब्दुल अजीज**
**मो.९१७५६५७२४१**

## टी.सी.हरवली

माझी गायकवाड अनुदिप अंतेश्वर या नावाची इयत्ता १० वी पास ची टी.सी.व मार्क मेमो आणि इतर महत्वाचे शैक्षनिक कागदपत्र दि. २७ जुन २०२५ रोजी मुखेड ते नांदेड एस.टी.ने प्रवास करतेवेळी हरवले आहेत. कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

**–संपर्क पत्ता–**
**गायकवाड अंतेश्वर यादवराव**
**समतानगर मुखेड**
**ता.मुखेड जि.नांदेड**
**मो.नं.९७६६६५९३८८**


# वाळू टाकण्याच्या वादातून तरूणाचा अपहरण करून खून

**जालना (प्रतिनिधी)** –वाळू टाकण्याच्या वादातून वाळूमाफियांनी अपहरण करून एका तरुणाची हत्या केल्याची घटना शनिवारी रात्री उघडकीस आली. सुरेश आर्दड (३३) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. रविवारी सकाळी या तरुणाचा बुलढाणा जिल्ह्यातील तढेगाव येथे मृतदेह आढळून आला. याप्रकरणी बुलढाणा जिल्ह्यातील किनगाव राजा पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलाय. फरार आरोपींचा शोध पोलीस सध्या घेत आहेत.

गेल्या अनेक महिन्यांपासून वाळू माफीयांच्या वाढत्या दहशतीची मोठी चर्चा असताना, जालना जिल्ह्यातील गोदापट्ट्यात वाळू माफियांनी पुन्हा डोकं वर काढले आहे. घनसावंगी तालुक्यातील कुंभारी पिंपळगाव या गावात धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

याविषयी मिळालेल्या अधिक माहितीनुसार सुरेश आर्दड हा शनिवारी रात्री कुंभार पिंपळगाव येथील बाजार समितीच्या परिसरात थांबला होता. वाळू टाकण्यावरून झालेल्या जुन्या वादातून चार जण तिथे आले. तरुणास बेदम मारहाण करत गावठी कट्टा व कुऱ्हाडीचा धाक दाखवत त्याचे कारमध्ये कोंबून अपहरण केले.


## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझे पक्षकार श्रीमती अनुसया सर्वेशम कोटलू राहणार राहणार साई हाईट, कौठा, नांदेड, यांनी मोहल्ला विष्णूनगर ता ज्याचा सिटी सर्वे नंबर ११०६८ ज्याचा म. न. पा.नं. १-१५-५७० आहे. ज्याची लांबी दक्षिण उत्तर ७.६२ मी. व रुंदी पूर्व पश्चीम ४.७१ मी. आहे ज्याचे एकुण क्षेत्रफळ ३५.८९ चौ.मी. ही मालमत्ता श्री बालाजी पिता भीमाशंकर आर्तमवार, वय ५७ वर्ष, व्यवसाय किराणा दुकान, राहणार विष्णूनगर, नांदेड

यांच्याकडून खरेदी करण्याचा करार केला असून त्यांना बयानाही दिलाय व विक्रेत्यांनी माझे पक्षकाराचे नावे सौदाचिठ्ठीही करून दिलेली आहे.

सदरचे घरांमध्ये टीन चे बांधकाम ज्यात संडास, बाथरूम, नळ, लाईट मीटर, लाईट फिटिंगसह सह असून ज्यांची लांबी दक्षिण उत्तर ७.६२ मी. व रुंदी पूर्व पश्चीम ४.७१ मी. आहे ज्याचे एकुण क्षेत्रफळ ३५.८९ चौ.मी. असून ज्याच्या चतु:सीमा पूर्वेस : श्री बाबुराव गोविंदराव निवळेकर यांचे घर, पश्चिमेस श्री पंढरीनाथ टप्पलवार (डपडवाड) यांचे घर आहे, दक्षिणेस: विष्णूनगर नांदेड ६.०९ मी. रुंद मेन रोड आहे, आणि उत्तरेस: श्री पंढरीनाथ टप्पलवार (डपडवाड) यांचे घर आहे येणे चतु:सिमेच्या आतील संपूर्ण प्लॉट व घर आंतरिक व बाह्य हक्कासह खरेदी करण्याचा सौदा केला आहे. तेव्हा या जाहीर प्रकटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की वरील मालमत्तेसंबंधी कोणाचे काही हित संबंध, गहाण, तारण, विक्री अथवा ताब्या बाबत अथवा कोणतेही कायदेशीर संबंध वा हक्क असल्यास हे प्रकटन प्रसिद्धीपासून दहा दिवसाच्या आत लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह माझे कार्यालयास सादर करावे. मुदतीचे आत कुणाचेही आक्षेप न आल्यास माझे अशील हे करारानुसार व्यवहार पूर्ण करून खरेदी खत करून घेतील व नंतरचे आलेले आक्षेप माझे अशीलावर बंधनकारक राहणार नाहीत. सबब हे जाहीर प्रकटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**ॲड.सावित्री जोशी,**
**नांदेड मोबाईल क्र. ९४२१७६१८९८**

## जाहीर प्रगटन

बिलोली येथील श्री. व्ही. आय. घोरपडे, सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात, नियमित दिवाणी दावा क्र. ०६/२०२५ पुढील तारीख २८.०७.२०२५

वादी:–सायलु पि. रामलु रौतलवार, वय – ५० वर्षे, धंदा:– शेती, रा. गळेगांव हा.मु. देगलुर ता देगलुर जि. नांदेड.

विरुध्द

प्रतिवादी:–बानबा पि. विठोबा नाईक व इतर ०१.

प्रति,

प्रतिवादी क्र. ०२) माधुरी सुधीर पत्की, वय – ३८ वर्ष, धंदा – शेती,रा. गळेगांव ता. बिलोली जि. नांदेड.

ज्याअर्थी आपणास या जाहीर समन्स/ नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सायलु पि. रामलु रौतलवार, वय – ५० वर्षे, धंदा:– शेती, रा. गळेगांव हा.मु. देगलुर ता. देगलुर जि. नांदेड यांनी या न्यायालयाकडे आपल्या विरुध्द नियमित दिवाणी दावा क्र. ०६/२०२५ अन्वये दावा दाखल केलेले आहे. सदरील दाव्यामध्ये आपण वर दिलेल्या प्रमाणे प्रतिवादी असुन आपल्याला सदरील दाव्यात दिलेल्या पत्यावर ब–याच वेळा समन्स व नोटीस पाठविण्यात आल्या, परंतु आपण सदरील समन्स व नोटीस घेण्यास जानुन बुजून टाळाटाळ करत आहात असे वादीचे म्हणने आहे.

तरी या जाहीर समन्स/ नोटीस द्वारे आपणास कळविण्यात येते की, हे जाहीर प्रगटन प्रसिध्दी झाल्यापासून ३० दिवसाच्या आत आपण स्वतः किंवा वकीलामार्फत या न्यायालयात हजर होउन आपले लेखी जवाब व म्हणने दाखल करावे. जर आपण दिलेल्या वेळेत/ तारखेस या न्यायालयात हजर राहण्यास कसूर केल्यास आपले विरुध्द योग्य तो आदेश पारीत करुन प्रकरण एकतर्फा चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी.आज दिनांक २५.०६.२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**आदेशावरून,**

**व.लिपीक** **सहाय्यक अधिक्षक**

**दिवाणी न्यायालय क. स्तर, बिलोली ता. बिलोली जि. नांदेड**

## टी.सी.हरवली

माझी जि.प.शाळा हिमायतनगर येथील शाहेदा बेगम शेख महेबुब ह्या नावाची इयत्ता दहावी पास ची टिसी ची मुळ प्रत हिमायतनगर ते नांदेड दरम्यान बस प्रवासात हरवली आहे कोणास सापडल्या संपर्क साधावा.

**–संपर्क पत्ता–**
**मो.क्रमांक ९०४९३३७१५२.**

## टी.सी.हरवली

माझी प्रमिता दत्तात्रय कांबळे या नावाची इयत्ता १० वी पास ची टी.सी.व महत्वाचे शैक्षनिक कागदपत्र दि. २६ जुन २०२५ रोजी मुखेड ते नांदेड एस.टी.ने प्रवास करतेवेळी हरवले आहेत.

कोणास सापडल्यास

**–संपर्क पत्ता.–**
**दत्तात्रय गणपतराव कांबळे**
**रा.सावरगाव पी.**
**ता.मुखेड जि.नांदेड**
**मो.नं.९०४९५६६९९३**

## टी.सी.हरवली

मी बालाजी नामदेव गायकवाड रा. ईटग्याळ ता. मुखेड जि.नांदेड येथील रहाणारा असून माझी १२ वी पास ची टि. सी मुक्रमाबाद ते उदगीर बस ने प्रवास करताना हरवली आहे. तरी कोणास सापडल्यास खालील पत्यांवर संपर्क साधावा.

**– संपर्क पत्ता–**
**बालाजी नामदेव**
**गायकवाड रा. ईटग्याळ**
**मुखेड मो. ७६६६३८८३४८,**
**७०३८३७१००४**

**जय फेरसा पेन शिक्षण संस्था संचलित**
**श्री संत तुकडोजी महाराज विद्यार्थी वसतिगृह**
**बजरंग कॉलनी नांदेड जि.नांदेड**

## प्रवेश देणे चालू आहे.

वरील वसतीगृहात सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात जातीनिहाय टक्केवारीनुसार प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती (एस.सी) | ६७ टक्के |
| २ | अनुसुचीत जमाती (एस.टी) | १४ टक्के |
| ३ | वि.जा./भ.ज./व्ही.जे./एन.टी | १७ टक्के |
| ४ | विशेष मागास प्रवर्ग एस.बी.सी | २ टक्के |
| ५ | इतर मागासवर्ग ओबीसी | १५ टक्के |
| ६ | आर्थिकदृष्ट्या मागासप्रवर्ग ओपन | ५ टक्के |

**वरील टक्केवारी प्रमाणे वसतिगृहात प्रवेश देण्यात येईल**
**अध्यक्ष/ सचिव**
**श्री संत तुकडोजी महाराज विद्यार्थी वसतिगृह**
**बजरंग कॉलनी नांदेड जि.नांदेड**
**मो.९४२०४१७५०३,८००७२९४६७४**

## जाहीर प्रगटन

मौजे वाडी बु. ता.जि. नांदेड हद्दीतील शेत गट नंबर ३८/अ/१ मधील प्लॉट नंबर ७ साईज ३० बाय ३० एकूण क्षे.९०० चौरस फुटरचा प्लॉट मुरली पि.चंद्रय्या कमटम रा.मेडचल हैद्राबाद यांचेकडून रामेश्वरी ज्ञानेश्वर काउलवार रा.नांदेड विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चुर्तसिमा पुर्वेस–प्लॉट नंबर ६, पश्चिमेस– प्लॉट नंरब ४, दक्षिणेस–उर्वरीत जागा,उत्तरेस – १५ फुट रोड

तरी वरील प्लॉट बद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा आक्षेप सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/ आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या उजर आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉट खरेदी खत करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणार**
**ज्ञानेश्वर विठ्ठलराव काउलवार**
**रा.रानसुगाव ता.नायगावं जि.नांदेड**
**मो.९४२१७६७८५३**

## टी.सी.हरवली

माझी सोहम धनंजय जाधव या नावाची डि फार्मसीची टि.सी. तरोडा नाका ते कलामंदीर ऑटोने प्रवासा दरम्यान हरवली आहेत कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा –

**संपर्क पत्ता**
**सोहम धनंजय जाधव**
**माणिक नगर राजकार्नर नांदेड**

## टी.सी.हरवली

माझी राजेश नागनाथ हंगरगे या नावाची इयत्ता १० वी पासची टि.सी. नांदेड ते कृष्णूर दरम्यान बस प्रवासा दरम्यान हरवली आहेत कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा –

**संपर्क पत्ता**
**राजेश नागनाथ हंगरगे**
**मु.पो.कुष्णूर ता.नायगांव**
**मो.९३२५७८१७७९**

## कागदपत्र हरवली

माझी अभिषेक ग्यानेश टाकळकर या नावाची १० वी,१२ वी बी.कॉम.प्रथम,द्वितीय,तृतीय वर्षाचे मार्कमेमो नांदेड ते लोहा दरम्यान बस प्रवासात हरवली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क करावा.

**–संपर्क पत्ता –**
**अभिषेक ग्यानेश**
**टाकळकर रा.राहूलनगर नांदेड**
**मो.७७०९०७८९५८**

## टी.सी.हरवली

माझी दिव्या विजय धनसुरे या नावाची इयत्ता दहावी पास ची टि सी देगलूर ते नांदेड या बस प्रवासात हरवली आहे जर कोणास सापडल्यास संपर्क साधावा.

**–संपर्क पत्ता:–**
**दिव्या विजय धनसुरे**
**मु.पो.खानापुर ता.देगलूर**

## Change In Name

My Old Name is USHA NIVRUTTI BUKTTARE which now I am changing as New Name USHA NIVRUTI BUKTARE Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.Address: USHA NIVRUTI BUKTARE WAMAN NAGAR NANDED MO.9011145445

## Change In Name

My Old Name is GAYATRI RAMSINHA SOLANKI which now I am changing as New Name GAYATRI RAMSINGH SOLANKI Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.Address: GAYATRI RAMSINGH SOLANKI VASANT NAGAR NANDED MO.9405528555

## पदवी प्रमाणपत्र हरवले

माझी आशाताई गंगाधर सुर्यवंशी या नावाची MSW समाजकार्य पदवी आयटीआय चौक ते शिवाजीनगर ऑटो प्रवासात हरवलेली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

**:–संपर्क पत्ता :–**
**आशा गंगाधर सुर्यवंशी**
**मो.८४१२०४१०८७**

## टी.सी.हरवली

माझी शहेबाज खॉन अलिम खान या नावाची १२ वी विज्ञान पासची टी.सी.देगलूर नाका ते रेल्वे स्टेशन ऑटो प्रवासात हरवलेली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

**:–संपर्क पत्ता :–**
**शहेबाज खॉन अलीम**
**खॉन साईनगर इतवारा नांदेड**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,**

## महात्मा गांधी डीएड कॉलेज,सिडको नवीन नांदेड.

(महाराष्ट्र शासन व एनसीटीई,भोपाळ,मान्यता प्राप्त)

डी.एल.एड.प्रथम वर्ष व्यवस्थापन कोटा प्रवेश सूचना -२०२५-२६

डि.एल.एड.प्रथम वर्ष प्रवेश २०२५-२६ ह्या शैकक्षणिक वर्षासाठी खाजगी विना अनुदानित अध्यापक विद्यालयात प्रथम वर्ष डी.एल.एड.(मराठी माध्यम) प्रवेशासाठी एकूण क्षमतेच्या २०% क्षमता ( खाजगी व्यवस्थापन कोट्यातील) पत्र उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

तरी पात्र उमेदवारांनी खालील दर्शविलेल्या कालावधीत आवेदन पत्र सदर करावेत.

.

- अर्ज विक्री : ०१/०७/२०२५ ते ०७/०७/२०२५
- अर्ज स्वीकृत : ०७/०७/२०२५
- ठिकाण : महात्मा गांधी डीएड कॉलेज,सिडको नवीन नांदेड
- प्रवेश अर्ज शुल्क : खुला:२००/-, मागासवर्ग:१००/-
- शैक्षणिक पात्रता : उमेदवार किमान १२वी कला,वाणिज्य,विज्ञान,एमसीव्हीसी अथवा य.च.म.मु.वी.प्रथम वर्ष उतीर्ण ,खुला प्रवर्ग-५०% व मागासवर्गीयांसाठी ४५% गुणासह उतीर्ण असणे आवश्यक आहे.
- प्रवेश क्षमता : ५० जागा (व्यवस्थापन कोटा १०जागा)

| शाखा | विज्ञान (५०%) | कला (४०%) | वाणिज्य (१०%) | एकूण |
|---|---|---|---|---|
| मराठी | ०५ | ०४ | ०१ | १० |

| संवर्ग | एस.सी./एस.टी. | व्ही.जे.एन.टी. एस.सी.बी.सी. | एस.बी.सी./ओ.बी.सी. | ओपन | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| मराठी माध्यम | ०२ | ०१ | ०२ | ०५ | १० |

प्राचार्य

महात्मा गांधी डी.एड.कॉलेज सिडको नवीन नांदेड

मो.क्र.७०२०८४१८५७,९८९०८०१८६७

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट, पहिला मजला, शिवाजी नगर, नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षापासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# १००८ श्री गुरुचरित्र सारामृत पारायणास प्रतिसाद





**नांदेड (प्रतिनिधी)–** गुरुतत्त्व प्रदीप नांदेड आयोजित १००८ श्री गुरुचरित्र सारामृत पारायण व श्री गुरुचरित्र कथामृत सप्ताहास सोमवारी (दि.३० जून) भक्ती लॉन्स मंगल कार्यालयात मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. जवळपास २१०० पुरुष, महिलाांनी श्री गुरुचरित्र सारामृत पारायण सोहळ्यामध्ये सहभाग नोंदवला. सदरील पारायण व कथामृत सप्ताहास प्रचंड प्रतिसाद लाभत आहे.

दक्षिणगंगा गोदावरी मातेच्या नाभीस्थानी बसलेल्या व संत महंताच्या वास्तव्याने पवन झालेल्या नांदेड नगरीमध्ये ११ पारायणाच्या मालिकेतील आठवे पुष्प आयोजित करण्यात आले आहे. धक्काधक्कीच्या काळातही श्री गुरुचरित्राची नितांत गरज असल्याकारणाने सर्व कडक नियमांना शिथिलता देऊन सर्व समाजातील स्त्री–पुरुषांना वाचता येण्याकरता या ग्रंथाची निर्मिती करून घेण्यात आली असल्याचे संयोजक निखील लातूरकर यांनी सांगितले. नांदेडच्या गुरुतत्त्व प्रदीप या आपल्या परिवाराने घरोघरी श्री गुरुचरित्र पोहोचावे या उदात्त हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. मागील एक वर्षाच्या कालखंडात १०८ व १००८ पारायण यांचे सामुदायिक कार्यक्रम सर्व भाविक भक्तांच्या सहकार्याने यथोचितरीच्या यापूर्वी संपन्न झालेले आहे. अधिकाधिक ठिकाणी याच पद्धतीने पारायण आयोजित करून गुरुत्व बोधाचा दीप प्रज्वलित करण्याचा गुरुतत्त्व प्रदीप यांचा मानस असल्याची माहितीही निखील लातूरकर यांनी दिली.

सदरील पारायण सेवा निःशुल्क असून पारायणास बसणाऱ्या वाचकास पारायण समाप्तीनंतर आयोजकांतर्फे ग्रंथ प्रसाद रूपाने दिला जाणार आहे. सकाळी ६ ते सायंकाळी ७ नित्य पूजा, सकाळी ८ ते १० राजोपचार लघु रुद्र अभिषेक, सकाळी ८ ते ९.३० सेवानंद संगीत सभा, सकाळी १० ते १२ नित्य पाठ व श्री गुरुचरित्र सारामृत पारायण, दुपारी बारा ते साडेबारा भिक्षा, नैवेद्य आरती व त्यानंतर दुपारी १२ ते ३ माध्यन्य भोजन प्रसाद दुपारी १ ते २:३० सेवानंद संगीत सभा व दुपारी ३ ते सायंकाळी ६.३० श्री गुरुचरित्र कथामृत असा हा साप्ताहिक कार्यक्रम असणार आहे. दि. ३० जून ते ७ जुलै हा साप्ताहिक कार्यक्रमाचा कालखंड आहे.

या कार्यक्रमासाठी परभणीच्या श्री क्षेत्र दत्तधामचे मकरंद महाराज, मानसी मकरंद वैद्य यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न होत आहे. सोमवारी झालेल्या पारायणानंतर दैनिक गोदातीर समाचारचे संपादक केशव घोणसे पाटील, उद्योजक संजय औरादकर, ज्येष्ठ पत्रकार विजय जोशी यांच्या हस्ते आरती करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी अखिल भारतीय ब्राह्मण संघटनेचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर, शंतनु पांडे, मिलिंद टाकळकर, शेखर लांडगे, मुकुंद मोगरेकर व इतर हजारो दत्त सेवक कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहेत.

# चार आरोपींना अटक; तीन तलवारिंसह दोन खंजर जप्त

**नांदेड (प्रतिनिधी) –** शहरातील इतवारा, शिवाजीनगर व ग्रामीण पोलीस ठाण्या अंतर्गत रस्ता सुरक्षा पथकाने रविवारी दि.२९ जून रोजी चार आरोपींना अटक केली. तसेच त्यांच्याकडून तीन तलवारी व दोन खंजर जप्तही जप्त केले.




पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी स्ट्रीट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत स्ट्रीट सेफ्टी पथक आणि शहरातील सर्व पोलीस ठाण्यांना भारतीय हत्यार कायदा अन्वये कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्ट्रीट सेफ्टी पथकाने शहरातील इतवारा भागात असलेल्या केळी मार्केट येथे मिल्लतनगर येथील रहिवासी आरोपी शेख सोहेल शेख अहमद याच्याकडून एक खंजर जप्त केला. याप्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे.

तसेच चौफाळा भागातील दिवाणी बावडीजवळ मोमीनपुरा येथील रहिवासी आरोपी मोहम्मद आसिफ मोहम्मद पाशा याच्याकडून एक खंजर जप्त केला. याप्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे. दरम्यान, शहरातील गोकुळनगर पाण्याच्या टाकीजवळ शहीदपुरा येथील रहिवासी आरोपी साईनाथ दिगंवर हंबर्डे याच्याकडून पथकाने एक तलवार जप्त केली. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे. तसेच जनता कॉलनी गोपाळ चावडी येथे तेथीलच रहिवासी आरोपी हरजीतसिंग करतारसिंग बावरी याच्याकडून पथकाने दोन तलवारी जप्त केल्या. याप्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे.

# दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या गुन्हेगारांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)–** रत्नाळी (ता. धर्माबाद) येथील हनुमान मंदिराजवळ २९ जूनच्या रात्री दीडच्या सुमारास दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या पाच जणांपैकी तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. तसेच त्यांच्या घातक शस्त्र जप्त केले. पण अंधाराचा फायदा घेत दोघेजण पसार झाले. पाच जणांविरुद्ध धर्माबाद पोलीस ठाण्यात दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धर्माबाद तालुक्यातील रत्नाळी या गावातील हनुमान मंदिराच्या परिसरात दरोडा टाकण्याच्या तयारीत दबा धरून बसलेल्या चोरट्यांना निरीक्षक सदाशिव भडीकर यांनी ताब्यात घेतले. आरोपी शेख इमरोज शेख अब्दुल रज्जाक (वय ३२ ), मोहंमद साहील मोहंमद साब (वय २७) आणि शेख असलम नासिफ (वय २६) यांना अटक केली.

मात्र दोघेजण अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले. पकडलेल्या तिन्ही चोरट्यांकडून लोखंडी रॉड, काठी आदी साहित्य जप्त केले. पोलीस अंमलदार पंडित जाधव यांच्या फिर्यादीवरून धर्माबाद पोलीस ठाण्यात वरील पाच जणांविरुद्ध दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक पगलवाड करत आहेत.

# वसरणीतील उत्तर ते दक्षिण मुख्य रस्त्यावर अतिक्रमण

## शाळकरी विद्यार्थ्यांना करावी लागते कसरत

**नांदेड (प्रतिनिधी)–** वसरणी भागातील गट क्रं. २९/ २ व २७/२ दरम्यान उत्तर ते दक्षिण रस्त्यावर दोघांनी अतिक्रमण केले आहे. ते अतिक्रमण महापालिकेने काढून घेऊन रस्ता मोकळा करावा, अशी मागणी या भागातील नागरिकांनी केली आहे.

गट क्रं. २९/२ मधील रहिवाशांनी २३ डिसेंबर २०२४ रोजी मनपाला रिकामी जागा ताब्यात घेण्याबाबत निवेदन दिले होते. त्यानंतर इंजिनियर मनोहर दंडेवार व किशन डुकरे यांनी स्थळ पाहणी करुन संचिका तयार करुन पाठविण्यात आली. त्यासंदर्भाने उप आयुक्त अजितपालसिंघ संधु यांना समक्ष भेटुन सर्व सविस्तर माहिती दिली. त्यांनी दोन दिवसांत तक्रारीचे निराकरण करु असे आश्वासन दिले. पण अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नाही.



मुख्य रस्ता बंद केल्यामुळे इतर मोकळ्या जागेतून रहिवाशांना जावे लागते. परंतू परिसरात पाऊस पडल्यामुळे रहिवाशांना जाण्यासाठी इतर कोणताही मार्ग नाही. त्याम ुळे मुलांना शाळा, ट्यूशन व इतर कामाकरीता जाण्यासाठी त्रास होत आहे.

या संदर्भात आयुक्तांना सुद्धा निवेदन देण्यात आले. पण अद्याप पर्यंत कोणती कारवाई करण्यात आलेली नाही. मालमत्ता विभागाचे दंडेवार यांनी कागदपत्रांची छाननी केलेली असून, त्यामध्ये गट क्रमांक २९/२ मधील अतिक्रमण केलेली जागा ही रिकामी जागा असल्याचे आढळून आले आहे.

त्यामुळे या मोकळ्या जागेवर करण्यात आलेले अतिक्रमण तातडीने काढून नागरिकांना वहिवाटीसाठी रस्ता मोकळा करून द्यावा, अशी मागणी वसरणी येथीलगट क्रं. २९/२ मधील रहिवाशांनी केली आहे.

# शेतकरी संघटनेची आज बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्व. शरद जोशी यांच्या मूळच्या शेतकरी संघटनेची मासिक बैठक मंगळवार, दि. १ जुलै रोजी दुपारी १ वाजता शेतकरी संघटनेचे नेते तथा केंद्रीय कृषिमूल्य आयोगाचे सदस्य गुणवंत पाटील हंगरगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड येथील बोरबनमधील 'म ाधवा'ज हॉलमध्ये आयोजित करण्यात आली आहे.

पुणे जिल्ह्यातील आंबेठाण येथे स्व. शरद जोशी यांचे स्मारक उभारण्याबाबत मोठा निर्णय घेण्यात येणार आहे. त्यामुळे ही बैठक अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या बैठकीला नांदेड जिल्ह्यातील शेतकरी संघटनेच्या सर्व पदाधिकारी, माजी जिल्हाध्यक्ष, कार्यकर्ते यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन शेतकरी संघटनेचे नांदेड जिल्हाप्रमुख शिवाजीराव शिंदे उंचेगांवकर यांनी केले आहे.




**नांदेड** : भोई समाज महासंघ नांदेडच्यावतीने भोई समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ व मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी खा. अजित गोपछडे, आ. हेमंत पाटील, व्याख्याते नितीन बानगुडे पाटील, आशालता गुट्टे, धाराशिव शिरोळे, राजु मामुलवार, श्रीराम डुबूकवाड, राजू वालगोटेवाड, गोविंद कोलंबीकर, यादव पंदीलवार, लहू पंदीलवार, विजय सरसमकर, सुनील निलेवार, हरी निलावार, संतोष निलावार, बालाजी गाडेवाड, दयानंद हाके दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

# सावरगाव माळ येथे शेतकऱ्याची आत्महत्या

**नांदेड (प्रतिनिधी)–** सततची नापिकीमुळे व बँकेच्या कर्जामुळे त्रस्त असलेल्या एका शेतकऱ्याने आपल्या शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना २८ जून रोजी सावरगाव (माळ) ता. हदगाव येथे घडली.

शेतकरी भगवान यादवराव माधववाड (वय ३७) यांच्या शेतात सततची नापिकी होत होती. त्यांनी एचडीएफसी बँकेचे पीक कर्ज काढले होते. शेतातील उत्पन्न घटल्याने पीक कर्ज परतफेड होत नव्हती. त्यामुळे त्रस्त झालेल्या भगवान माधववाड यांने आपल्या शेतात एका झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेची माहिती नारायण माधववाड यांनी मनाठा पोलिसांना दिल्यानंतर पोलिसांनी एकात्मिक मृत्यूची नोंद केली आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक इंगोले करत आहेत.

# फ्लाईंग ऑफिसर अभिजीत जाधव यांचा 'छावा'कडून सन्मान

**नांदेड (प्रतिनिधी)–** गोदाकाठच्या वांगी (ता.मुदखेड) येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबातील अभिजीत विजयकुमार जाधव यांची इंडियन एअर फोर्सच्या फ्लाईंग ऑफिसर म्हणून नुकतीच निवड झाली आहे. नांदेडच्या भूमिपुत्राची एअर फोर्स फ्लाईंग ऑफिसर मध्ये निवड होणे हा नांदेडकरांचा बहुमान आहे. या यशस्वी तरुणाचा सन्मान करण्यासाठी छावा मराठा संघटनेने एक छोटेखानी कार्यक्रमात त्यांचा सत्कार करण्यात आला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लालबहादूर शास्त्री महाविद्यालय धर्माबाद येथील प्राचार्य डॉ. कमलाकर कनसे तर प्रमुख पाहुणे म्हणून इंजि. तानाजी हुस्सेकर यांची उपस्थिती होती. डॉ. प्रभाकर जाधव यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर बोलतांना अभिजीत जाधव यांनी आपल्या यशापाठीम ागचे रहस्य उलगडून सांगितले.

त्यानंतर इंजि. तानाजी हुस्सेकर आणि डॉ. कमलाकर कनसे यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. त्यानंतर सर्वाच्या उपस्थितीमध्ये छावाच्या वतीने फ्लाईंग ऑफिसर अभिजीत जाधव यांचे अभिनंदन करून त्यांचा ग्रंथ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी छावा मराठा संघटनेचे प्रदेश अध्यक्ष इंजि. तानाजी हुस्सेकर, प्राचार्य कमलाकर कनसे, डॉ. प्रभाकर जाधव डॉ. स्वप्नील आढाव, दीपक पावडे, सुधाकर मुंगल, भास्कर थेटे, विवेक ताटे, अजय कदम, गणेश वडजे,विनोद म हाजन, शिवाजी पाटील, प्रा. मेहेत्रे सर,सुहास गुट्टे, भुजंग बंडाळे, विजय शेळगावकर, गोपीनाथ हुस्सेकर, संजय वांगीकर, संजय हंबर्डे, पप्पू कदम, सर्वज्ञ, श्रवण आदींची उपस्थिती होती.

# क्रीडा संकुलासाठी प्रयत्न करु -आ. आनंद बोंढारकर

## ऑलम्पिक क्रीडा सप्ताहाची नियोजन भवनात सांगता

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील खेळाडूंची क्रीडा विषयक रुची, आवड तसेच क्रीडा क्षेत्रातील नेत्रदिपक प्राप्त होत असलेले यश पाहता नांदेड येथे अद्ययावत जिल्हा विभागीय क्रीडा संकुलाची गरज आहे. ती पूर्ण होण्यासाठी आपण प्रयत्न करू, असा विश्वास नांदेड दक्षिणचे आ. आनंदराव बोंढारकर यांनी दिला.

दि. २९ जून रोजी नियोजन भवनात ऑलम्पिक क्रीडा सत्ताहाची सांगता झाली. या प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त जनार्दन गुपीले हे होते. यावेळी भाजपा महानगराध्यक्ष अमर राजूरकर, क्रीडाधिकारी जयकुमार टेबरे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. दीपक बच्चेवार, कार्याध्यक्ष प्रलोभ कुलकर्णी, अध्यक्ष अवतारसिंग रामगडीया, महासचिव डॉ. राहुल वाघमारे डॉ. हंसराज वैद्य यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

विनय गडगिळे हिच्या स्वागत गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. नांदेड भूषण क्रीडा संघटक पुरस्कार डॉ. हंसराज वैद्य यांना रोख दहा हजार रुपये, सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन तसेच नांदेड भूषण क्रीडा मार्गदर्शक डॉ. राहुलसिंह चंदेल व दुर्गेश सूर्यवंशी यांना विभागून तर नांदेड भूषण क्रीडा गुणवंत खेळाडू सृष्टी जोगदंड आणि किरण नागरे यांना विभागून देण्यात आला. त्यासोबतच विविध संघटनेच्या नांदेड जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्रात उत्तम कामगिरी व राष्ट्रीय पातळीवर नेत्रदीपक यश संपादन केलेल्या जवळपास १५० राष्ट्रीय खेळाडूंचा सन्मानपत्र, प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला ज्येष्ठ क्रीडा मार्गदर्शक माजी संचालक डॉ. विठ्ठलसिंह परीहार, बालाजी जाधव डॉ. जुजारसिंग शिलेदार, सेवानिवृत्त जिल्हा क्रीडा अधिकारी अनंत बोबडे, सेवानिवृत्त क्रीडा अधिकारी किशोर पाठक, विलास नागेश्वर यांचाही यावेळी सन्मान गौरव करण्यात आला.



दि. २३ ते २९ जून दरम्यान नांदेड शहर आणि जिल्हाभरामध्ये विविध क्रीडा संघटना आणि ऑलम्पिक असोसिएशन नांदेड यांच्या वतीने ठिकठिकाणी क्रीडा विषयक कार्यक्रम घेण्यात आले. नांदेड येथे अद्ययावत विभागीय जिल्हा विभागीय क्रीडा संकुल उभारणीसाठी प्रयत्नशील राहू, असे आ. बोंढारकर व माजी आमदार, भाजपा महानगराध्यक्ष अमरनाथ राजुरकर यांनी आश्वासन दिले. प्रियांका गायकवाड हिने सूत्रसंचालन, बालाजी जोगदंड यांनी आभार मानले. कार्यक्रम ासाठी शिवाजी जाधव, आकाश मुंगल, सुभाष कुरे, संतोष मि टकर, वैजनाथ नावदे, कन्हैय्या खानसोळे, प्रसेनजीत जाधव, आशा भरकट, कोमल गड्डुमवाड, रामा जाधव, नेहा गडगे यांनी परीश्रम घेतले.

# शुभदा वरपडे-कोंडलवाडीकर सेवानिवृत्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र वडगाव येथील आरोग्य सहाय्यक शुभदा परशुराम वरपडे – कोंडलवाडीकर या नियतवयोम ानानुसार दि. ३० जून रोजी सेवानिवृत्त झाल्या. सेवानिवृत्ती निमित्त प्राथमिक आरोग्य केंद्रात त्यांचा सत्कार करून निरोप देण्यात आला.



आरोग्य सहाय्यक शुभदा वरपडे या दि. १५ मार्च १९८६ म ध्ये जिल्हा परिषदेमध्ये शासकीय सेवेत रूजू झाल्या होत्या. त्यांनी अत्यंत चांगल्या पध्दतीने नागरिकांना आरोग्य सुविधा पुरविल्या. दि. २२ जून २०२२ रोजी पदोन्नतीने आरोग्य सहाय्यक म्हणून त्यांनी प्रदिर्घ असे कामकाज केले. शुभदा वरपडे यांनी ३९ वर्ष ३ महिने अशी प्रदिर्घ सेवा बजावली. शासकीय वयोमानानुसार दि.३० जून रोजी त्या सेवानिवृत्त झाल्या आहेत. सेवानिवृत्ती निमित्त प्राथमिक आरोग्य केंद्र वडगाव येथे त्यांचा शाल, पुष्पहार घालून यथोचित सन्मान करण्यात आला.

यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. अमजद, डॉ. पाईकराव, फार्मासिस्ट मरेवार, आरोग्य सहाय्यक कुंटूरवार, कौशल्य कनिष्ठ सहाय्यक खरात स्वामी, सिस्टर, नाईक सिस्टर, सानप सिस्टर, शिंदे सिस्टर, शेगावकर सिस्टर, सुवर्णा, गोदावरी, आशा वर्कर आदी वडगाव प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com